श्रीमद्भगवद्गीतेची यथावत सुबोध व्याख्या

भाग- २

इयत्ता-६वी ते १० वी

# बाल गीता

## विश्वातील सर्व विद्यार्थ्यांसाठी




यथार्थगीतेचे रचनाकार-

स्वामी अड़गड़ानन्दजी महाराज

॥ यथार्थ गीता ॥

मानवमात्राचे एकमेव धर्मशास्त्र




मुले व सर्व विद्यार्थी - गीता जाणण्यास खरे योग्य

| सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार | शनिवार |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

|| ॐ श्री सद्गुरुदेवाय नमः ||

| भाग– २ |
| --- |
| इयत्ता-६वी ते१० वी |

# बाल गीता

## विश्वातील सर्व विद्यार्थ्यांसाठी

मुलांमध्ये संस्कारांची वृद्धि होण्याच्या हेतूने

**पूज्य स्वामी श्री अड़गड़ानन्दजी महाराज**

ह्यांच्या श्रीमुखातून निघालेल्या

उपदेशक अमृतवाणीचे संकलन

* मुले व सर्व विद्यार्थी-गीता जाणण्यास खरे योग्य *

ॐ

प्रकाशक :

**श्री परमहंस स्वामी अड़गड़ानन्दजी आश्रम ट्रस्ट**

न्यू अपोलो स्टेट, गाळा नं. 5 अणि 11 मोगरा लेन,(रेलवे सब-वे च्या जवळ), अंधेरी पूर्व,

मुम्बई - 400069 भारत. फोन : (091-22) 2825 5300

प्रकाशक :

**श्री परमहंस स्वामी अड़गड़ानन्दजी आश्रम ट्रस्ट**

न्यू अपोलो स्टेट, गाळा नं. 5 अणि 11 मोगरा लेन,

(रेलवे सब-वे च्या जवळ), अंधेरी पूर्व,

मुम्बई ४०००६९, भारत.

फोन : (०९१-२२) २८२५ ५३००

फॅक्स : (०९१-२२)

ईमेल : contact@yatharthgeeta.com

वेबसाइट : www.yatharthgeeta.com

© प्रकाशक **श्री परमहंस स्वामी अड़गड़ानन्दजी महाराज**

प्रकाशन– ऑगस्ट २०१० ते मे २०११ - १५,००० प्रति

सप्टेंबर २०२० - १०,००० प्रति

मूल्य– रु. 50./- मात्र

मुद्रक :

**जॅक प्रिण्टर्स प्रा.लि.**

जॅक कम्पाऊण्ड, दादोजी कोंडदेव क्रॉस लेन

भायखळा (पूर्व), मुम्बई - 400 027, भारत

फोन नं.- **(0091-22) 6734 3131**

वेबसाइट - www.jakprinters.com

ISBN: 81-89308-77-7

The illustrations and contents of this book have been complied to the best of our knowledge for the benefit of the general public. We have no intention to hurt any individual, institutions or religious belief at all. We do not take any responsibility for the above morally or legally.

All right reserved around the world. No part of this publication may be reproduced, stored in a retrieval system, or transmitted in any form, electronic, mechanical or otherwise, without the prior permission of the publishers.

# प्रकाशकाचे निवेदन

१९८३ साली गुरुपौर्णिमेला ईश्वरी प्रेरणेने प्रकट झालेल्या 'यथार्थ 'गीते'स भारतानेच नव्हे तर पूर्ण विश्वाने स्वीकारले. कोटयावधि लोक ह्या यथार्थ ज्ञानाने न्हाऊन निघत आहेत. ह्याच उद्देशाने शिक्षक, पालक, आणि भाविकांच्या आग्रहाखातर व पूज्य स्वामीजींच्या प्रेरणेने, लहान मुले तसेच विद्यार्थ्यांसाठी गीता-ज्ञानाच्या ह्या पुस्तिकेचे प्रकाशन केले गेले आहे, की जे केवळ भारतातीलच नव्हे तर साऱ्या विश्वातील भावी नागरिकांना आकर्षित करेल.

वस्तुतः गीतेमध्ये वापरलेले शब्द, यौगिक शब्द आहेत, त्यांचे स्वतःचे असे एक लालित्य आहे, सौंदर्य आहे; त्या शब्दांना बदलणे तर शक्य नाही. हां! परंतु त्यांना सरळ, सुबोध रुपामध्ये प्रस्तुत करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

सर्व माता-पिता, पालक तसेच शिक्षकवृंदाला ही विनंती आहे की, त्यांनी आपल्या मुलांना तसेच विद्यार्थ्यांना ईश्वरीय गायन 'गीते'शी परिचित करावे. त्यांच्या शंकांचे तसेच जिज्ञासांचे निराकरण करावे, ज्यामुळे त्यांच्यामध्ये श्रेष्ठ संस्कारांचे सृजन होईल, त्यांच्या पुण्य-पुरुषार्थात वृध्दि होईल आणि जीवनातील प्रत्येक क्षेत्रात ते यश प्राप्त करतील.

आपणा सर्वांकडून ही अपेक्षा आहे की ही पुस्तिका आणि 'यथार्थ गीता' प्रत्येक घरात, शाळेत, वाचनालयात आणि प्रत्येक विद्यार्थ्याच्या दप्तरामध्ये असावी. वस्तुतः तमाम रूढि, अंधविश्वास तसेच पूर्वग्रहांपासून मुक्त असलेली मुलेच 'गीता' जाणण्यास खरी योग्य आहेत.

**ह्यासाठी नेम करूया की सर्व विद्यार्थी -**

- दररोज, सकाळी अथवा संध्याकाळी यथार्थ गीतेच्या चार श्लोकांचे चाल लावून अर्थासहित वाचन करतील.
- दर आठवडयाला एक श्लोक पाठ करतील.
- प्रत्येक आठवडयाला 'यथार्थ गीता' ह्यामधील तीन श्लोक वही मध्ये लिहून आणतील.
- आठवडयातून एकदा एक तास 'गीता ज्ञान सभेचे' आयोजन करून यथार्थ गीतेच्या श्लोकांचे अर्थासहित सामूहिक वाचन व चर्चा करतील. शिक्षक व पालक त्यांच्या शंकांचे निरसन करतील.

ह्या पुस्तिकेचे मुलांच्या वाढदिवसाला, मंगल कार्यांमध्ये व शाळांमध्ये मुक्तहस्ताने वितरण करावे. ह्यामुळे मुलांवर तर चांगले संस्कार होतीलच पण त्याचबरोबर आपलेही कल्याण होईल.

आपल्या सर्व मुलांना व विद्यार्थ्यांना प्रकाशकांतर्फे शुभेच्छा.

**–प्रकाशक**

# संबोधन

## विश्वाचे आदि धर्मशास्त्र - श्रीमद्भगवद्गीता

प्रिय मुलांनो,

आपण जाणण्यास उत्सुक असाल की 'गीता' कोठे प्रगट झाली? संपूर्ण विश्वाला समान शांतता, समृद्धि, संप्रदाय व भेदभावापासून मुक्तता, बंधुभाव-स्नेह-सम्मान आणि परमपद, प्रदान करणाऱ्या 'गीते' ची उत्पत्ति भारतात झाली.

सृष्टीच्या आरंभी कोट्यावधि वर्षांपूर्वी हिमालयाच्या तपोभूमीवर भगवान नारायणाने ही प्रथम सूर्याला सांगितली. सूर्यापासून महाराज मनूला ती प्राप्त झाली. मनूने इक्ष्वाकुला सांगितली आणि इक्ष्वाकुकडून राजर्षींनी जाणली. त्या महत्वपूर्ण कालानंतर हा अविनाशी योग ह्या भूतलावरून लुप्त होत चालला होता. परंतु अविनाशीचा तर विनाश होत नाही, केवळ विस्मरण झाले होते. तोच योग भगवान श्रीकृष्णाने द्वापार मध्ये महाभारतात वर्णिलेल्या कुरुक्षेत्राच्या रणभूमीवर आपला सखा-मित्र-शिष्य असलेल्या अर्जुनास सांगितला.

मुलांनो, काही कालावधीनंतर तेच आदिशास्त्र गीता आज आपल्या मूळ आशयाला सुरक्षित ठेऊन आपल्या समक्ष आहे, आपल्या हातात आहे. ह्या अनुपम, दुर्लभ शास्त्राचे जन्म-स्थान भारतच आहे. म्हणूनच हा भारताचा राष्ट्रीय दर्शन ग्रंथ आहे आणि विश्वातील मानवाला संबोधित असल्या कारणाने हा आंतरराष्ट्रीय ग्रंथही आहे.

तेव्हा, अनादिकालापासून त्या एका परमपित्या परमात्म्याचा साक्षात्कार आणि त्यास धारण करण्याच्या विधि-विशेषांनी युक्त असलेली श्रीमद्भगवद्गीताच विश्वाचे आदि धर्मशास्त्र आहे. जे त्या परमात्म्याच्याच श्रीमुखातून निघालेले प्रसारण आहे.

सुख, शांति, समृद्धि व सफलतेची साधना म्हणजे गीता!

**– स्वामी श्री अड़गड़ानन्दजी**

# विवरण-सूची

पृष्ठ संख्या


| | | |
|---|---|---|
| १. | प्रार्थना | १ |
| २. | वन्दना | ३ |
| ३. | आशीर्वचन | ४ |
| ४. | विश्वविश्रुत (विश्वविख्यात) गीतेवर विद्वानांचे विचार. | ६ |
| ५. | 'गीता' आणि भारताचा स्वातंत्र्य लढा. | ९ |
| ६. | 'गीते' वर राष्ट्रपिता महात्मा गांधींचे विचार. | १० |
| ७. | ज्ञानामृत गीतेचा प्रादुर्भाव - महाभारत कथा. | ११ |
| ८. | सत्य सनातन उद्‌बोधन. | १७ |
| ९. | विश्वाचे आदि धर्मशास्त्र – श्रीमद्‌भगवद्‌गीता. | २१ |
| १०. | 'गीते' ची यथावत् सुबोध मराठी व्याख्या 'यथार्थ गीता'. | २४ |
| ११. | 'गीता' – महिमा गान | २६ |
| १२. | धर्म, धर्मशास्त्र आणि धर्मसिद्धान्त. | २७ |
| १३. | विद्यार्थ्यांचे कर्तव्य. | ३६ |
| १४. | सफलता, समृद्धि व साधनेचा मंत्र. | ३८ |
| १५. | ब्रह्मचर्याचे पालन करावे. | ४१ |
| १६. | आत्मोन्नतीचे सुवर्ण नियम. | ४३ |
| १७. | गुरुमहिमा व गुरु-शिष्य परंपरा. | ४४ |
| १८. | गौरवशाली ऐतिहासिक ग्रंथ 'महाभारत'. | ४५ |
| १९. | 'महाभारत' व 'गीते' मधील प्रेरणादायी व बोधक प्रसंग – | |
| | ❑ गीतेचे नियमित अध्ययन व श्रवण करावे. | ४९ |
| | ❑ गर्विष्ठ असू नये. | ५० |
| | ❑ ब्रह्मचर्येमध्ये अमर्याद शक्ति आहे. | ५२ |
| | ❑ धर्मच सफ़लतेचा ठेवा आहे. | ५४ |
| | ❑ परमेश्वराच्या आशीर्वादाने सर्व काही प्राप्त होते. | ५६ |
| २०. | 'यथार्थ गीते'चे रचनाकार | ५८ |
| २१. | 'यथार्थ गीते' मधून- | ५९ |
| २२. | स्वामीजींना समर्पित पदव्या व सम्मान पत्रके. | ६२ |


॥ ॐ ॥

# ॐ चा महिमा

ॐ नाम के साबुन से, जो मन का मैल छुड़ायेगा।
निर्मल मन के मंदिर में, भगवान् का दर्शन पायेगा।।

ओम् च्या उच्चारणाने मन शांत होते आणि शक्ति, साहस व सामर्थ्य प्राप्त होते तसेच परमदेव परमात्म्याच्या निकट असल्याची अनुभूति मिळते.

- निराशा, असफलता आणि विपत्ति मध्ये इष्ट स्वरूपाचे ध्यान आणि ॐ चा जप करावा

* * *

# गीता-महिमा

गीतायाः श्लोकपाठेन गोविन्दस्मृतिकीर्तनात्।
साधुदर्शनामात्रेण तीर्थकोटिफलं लभेत्।।

गीतेतील श्लोकांच्या पाठांतराने, भगवान श्रीकृष्णांच्या स्मरणाने आणि भजनाने (ओम् चा जप) तसेच संतांच्या केवळ दर्शनाने कोटयावधि तीर्थक्षेत्रांचे पुण्य प्राप्त होते.

ॐ शान्तिः! शान्तिः!! शान्तिः!!!

**॥ ॐ श्री परमात्मने नमः ॥**

# प्रार्थना

## हे प्रभो ! आनन्ददाता !

हे प्रभो! आनन्ददाता! ज्ञान हमको दीजिये ।
शीघ्र सारे दुर्गुणों को, दूर हमसे कीजिये ॥
लीजिये हमको शरण में, हम सदाचारी बनें ।
ब्रह्मचारी, धर्मरक्षक, वीर व्रतधारी बनें ॥
निन्दा किसी की हम किसी से, भूलकर भी ना करें ।
ईर्ष्या कभी भी हम किसी से, भूलकर भी ना करें ॥
सत्य बोलें झूठ त्यागें, मेल आपस में करें ।
दिव्य जीवन हो हमारा, यश तेरा गाया करें ॥
मातृभूमि पितु-मातु सेवा, हो अधिक प्यारी हमें ।
देश की सेवा करें, निज देश हितकारी बनें ॥
कीजिये हम पर कृपा, ऐसी हे परमात्मा ।
मोह मद मत्सर रहित, होवे हमारी आत्मा ॥
प्रेम से हम गुरुजनों की, नित्य ही सेवा करें ।
प्रेम से परमात्मन्! हम आपका चिन्तन करें ॥
योगविद्या ब्रह्मविद्या, हो अधिक प्यारी हमें ।
ब्रह्मस्थिति प्राप्त करके, सर्वहितकारी बनें ॥



॥ ॐ ॥



॥ॐ श्री सद्‌गुरुदेवाय नमः॥

# वन्दना

त्वमेव माता च पिता त्वमेव,
त्वमेव बन्धुश्च सखा त्वमेव।
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव,
त्वमेव सर्वं मम देवदेव॥

**अर्थ–** तुम्हीच माता आहात, तुम्हीच पिता आहात, तुम्हीच बंधु आहात, तुम्हीच सखा आहात. तुम्हीच विद्या आहात, तुम्हीच सामर्थ्य आहात, हे देवाधिदेवा! सद्‌गुरुदेवा! तुम्हीच माझे सर्वस्व आहात.

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः।
गुरुर्साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवेनमः॥

**अर्थ–** गुरुच ब्रह्मा आहेत (सृष्टीचे रचनाकार आहेत), गुरुच विष्णु आहेत (विश्वातील अणु-रेणुंमध्ये, कणा-कणामध्ये व्याप्त आहेत),गुरुच महेश्वर आहेत (महान ईश्वर, परमात्मा आहेत) तसेच गुरुच साक्षात साकार ब्रह्मस्वरूप आहेत, अर्थात ह्या सर्वांना प्राप्त करण्याचे साधन (जागृति) व माध्यम सद्गुरुच आहेत. मी त्या गुरुदेवांना नमस्कार करतो.

ध्यानमूलं गुरोर्मूर्तिः पूजामूलं गुरोर्पदम्।
मंत्रमूलं गुरोर्वाक्यं मोक्षमूलं गुरोर्कृपा॥

**अर्थ–** गुरूंच्या स्वरूपाचेच ध्यान,गरूंच्या श्रीचरणांचीच पूजा, गुरुदेवांच्या श्रीमुखातून निघालेले शब्दच मंत्र आहेत, तसेच गुरूंची कृपा हाच मोक्षाचा आधार आहे.

# आशीर्वचन

**प्रिय विद्यार्थ्यांनो!**



तुमच्या जीवनातील हा सर्वात महत्वपूर्ण व ऐतिहासिक क्षण आहे कारण आता तुम्ही 'गीते' शी परिचित होणार आहात. 'गीता' ज्ञानाचा सागर आहे आणि ईश्वरीय गायनाचे आदिशास्त्र आहे. सृष्टीच्या प्रारंभापासून प्रसारित झालेले गीता-ज्ञान हे विश्वातील मानवतेची सर्वात पहिली आणि प्राचीन अमूल्य ठेव आहे.

अनादिकाळापासून गीतेने सत्यशोधकांच्या तसेच जिज्ञासूंच्या सर्व प्रश्नांचे निराकरण केले आहे आणि आजही करत आहे. तुमच्या डोक्यातही उठणाऱ्या सर्व प्रश्नांचे जसे ही सृष्टि कशी निर्माण झाली? तिचा कर्ता कोण? माझ्या जन्माचे आणि जीवनाचे उद्देश्य काय आहे? अशा अनेक जीवसृष्टी, ब्रह्मांड आणि अध्यात्माशी संबंधित सर्व शंकांचे व प्रश्नांचे उत्तर 'गीते' मध्ये आहे.

आर्यावर्त भारतात उदयास येऊन पूर्ण विश्वाला प्रकाशित करणारी 'गीता' भारताला गौरवास्पद आहे. विश्वातील सर्वप्रथम तसेच सर्वात प्राचीन अशा भारतीय संस्कृतीने, दर्शनशास्त्र तसेच अध्यात्माने पूर्ण विश्वाला प्रभावित व आकर्षित केले आहे. म्हणूनच भारताला 'विश्वगुरु' म्हटले जाते.

'गीता' विश्व-दर्शन आहे. सृष्टीच्या प्रारंभापासून प्रसारित झालेल्या ह्या अविनाशी योगास, योगेश्वर श्रीकृष्णाच्या वाणीस, ५२०० वर्षांपूर्वी महर्षि वेदव्यासांनी लिपिबद्ध करून 'श्रीमद्भगवद्गीता-शास्त्रा' चे स्वरूप प्रदान केले होते. गीतेचीच देणगी आहे की 'सत्य' केवळ एक ईश्वर, आत्मा वा परमात्मा आहे. वर्तमानातील व तीन-साडेतीन हजार वर्षांपासून प्रचलित असलेल्या विश्वातील सर्व पंथ, संप्रदाय व सिद्धातांमध्ये गीतेतील एक ईश्वरवादाचाच ओघ सापडतो. विश्वातील सर्व महापुरुष एक आहेत आणि त्या सर्वांनी एक ईश्वर आणि त्यास प्राप्त करण्याच्या 'धर्म सिद्धांतांना' आप-आपल्या देश-काळातील भाषेमध्ये समजावले आहे.कोणीही महापुरुष कधी समाजामध्ये फूट पाडत नाही. हां, त्या महापुरुषानंतर त्याच्या मागे संघटित झालेल्या समाजाव्दारा फूट पाडली जाते. वस्तुतः ईश्वर एक आहे, एकापेक्षा जास्त, दोन होऊच शकत नाहीत, जर दोन असतील तर त्यास व्याप्त

होण्यासाठी दुसरी सृष्टि पण हवी.

प्रिय मुंलानो, सृष्टीच्या प्रारंभापासून प्रसारित झालेली 'गीता' एक सार्वकालीक (सर्व काळांमध्ये उपयुक्त), सार्वलौकिक (सर्व जगामध्ये व्याप्त) आणि सार्वजनिक (सर्वांसाठी उपयुक्त) 'मानव शास्त्र' आहे. एका परमात्म्याला धारण करण्याच्या विधि- नियमांच्या ईश्वरीय वाणीचे संकलन असल्याकारणाने ती मानवमात्राचे धर्मशास्त्र आहे. सृष्टीच्या प्रारंभापासून (आदि) प्रसारित आहे म्हणून मानवमात्राचे आदि 'धर्मशास्त्र' आहे.

कालावधीनंतर गीतेचा मूळ आशय 'हरवला' गेला. ५२०० वर्षांनंतर योगेश्वर श्रीकृष्णांचा आशय जसाच्या तसा 'यथार्थ गीते' मध्ये प्रस्तुत केला गेलेला आहे. 'यथार्थ गीते' च्या प्रसारणाने धर्म आणि धर्माच्या नावावर निर्माण झालेल्या सर्व वाईट रीति, रूढी आणि अंधविश्वासाचे निराकरण करून ईश्वर प्राप्तीच्या समग्र साधन - पद्धतीला पुनर्प्रकाशित केले गेले आहे. 'यथार्थ गीते'च्या प्रकाशात भारतातीलच नव्हे तर विश्वातील सर्व समस्यांचे निराकरण सापडते. संपूर्ण माहितीसाठी 'यथार्थ गीता' तीन वेळा अवश्य वाचा.' यथार्थ गीता' भारतीय तसेच विश्वातील सर्व प्रमुख भाषांमध्ये अनुवादित व उपलब्ध आहे, इंटरनेटवरही ती आपण बघू शकता. ( www.yatharthgeeta.com )

प्रिय विद्यार्थ्यांनो! गीतेचे अनुसरण आणि नियमित अध्ययन करून तुम्ही तुमच्या जीवनातील सर्व उद्दिष्टे पूर्ण करू शकाल. उपयुक्त शिक्षण, उत्तम मिळकत, सुख-समृद्धि, ऐश्वर्य आणि विभूति तुम्हाला वरेल आणि आध्यात्मिक मार्गावर क्रमा-क्रमाने उन्नति होत मोक्षही प्राप्त होईल. आपणा सर्व मुलांचे आश्रमात स्वागत आहे. विश्वातील सर्व भावी नागरिकांना आव्हान आहे की 'यथार्थ गीते'द्वारे त्यांनी विश्वामध्ये शांतता आणि 'वसुधैवकुटुम्बकम्'ला साकार करावे.

आपले जीवन मंगलमय होवो!

**–स्वामी श्री अड़गड़ानन्द जी**

श्री गुरुपौर्णिमा, १८ जुलै, २००८.

श्री परमहंस आश्रम, ग्रा. व पो,– शक्तेषगढ़,

चुनार – मिर्जापुर (उ. प्र.)

# विश्वविश्रुत 'गीता'

**विद्यार्थ्यांनो!**

**गीतेचा परिचय करून घेण्याआधी ह्या विश्वविश्रुत (विश्वप्रसिद्ध) दिव्य ज्ञानावर लोकांचे काय विचार आहेत ते जाणून घेऊया.**

## भारतीय धर्म, दर्शन, संस्कृति म्हणजेच 'गीते'वर जगातील संत, दार्शनिक व इतिहासकारांचे विचार



- भगवद्गीता विश्वातील सर्वात सुंदर आणि महान ज्ञानाची दार्शनिक कृति आहे.

– डब्लू.वान.हम्बोल्ड (जर्मन विद्वान)

- पूर्वेकडच्या जगतामधील सर्व स्मरणीय वस्तूंमध्ये 'भगवद्गीते' पेक्षा श्रेष्ठ कोणतीही रचना नाही. गीते बरोबर तुलना करता जगातील आधुनिक समस्त ज्ञान मला तुच्छ वाटते. मी नेहमी प्रातःकाळी माझ्या हृदयाला आणि बुद्धीला गीतारुपी पवित्र जलाने स्नान करविते.



- प्राचीन युगातील सर्वोत्तम गोष्टींमध्ये 'गीते'पेक्षा श्रेष्ठ काहीही नाही. 'गीते'मध्ये असे उत्तम व सर्वव्यापी ज्ञान आहे की त्याच्या रचनेनंतर इतक्या वर्षात एकही तसाच दुसरा ग्रंथ लिहिला गेला नाही.

– महत्मा थोरो (अमेरिकन दार्शनिक)



- 'गीता' हा जगातील उत्कृष्ट असा ज्ञानाचा नजराणा आहे. जगातील सर्व धार्मिक मतमतांतरांचे सार ह्या एका पुस्तकात पहायला मिळते.

– अलबेरुनी (अरबी विद्वान)



- 'आम्ही भारतीय दर्शनशास्त्राचे आणि ज्ञानाचे सदा ऋणी राहू. भारतानेच आम्हाला गणना शास्त्र शिकविले आणि शून्याची (zero) माहिती दिली. त्याशिवाय कोणताही वैज्ञानिक शोध लागू शकला नसता.'

– अलबर्ट आईनस्टईन (अमेरिकन वैज्ञानिक)



- धर्माच्या बाबतीत अन्य सर्व देश निर्धन आहेत तर भारत ह्यामध्ये शिरोमणि आहे.

– मार्क ट्वेन (अमेरिकन विद्वान)



- 'भारत' आपल्या मानवजातीची मातृभूमि आहे व संस्कृत भाषा युरोपातील सर्व भाषांची जननी आहे. ती आपल्या वेदांतशास्त्र, गणित, विज्ञान, स्वराज्य तसेच जनतंत्राची जननी आहे. भारतदेश आमची माता आहे.

– बिलड्राण्ट (अमेरिकन इतिहासकार)



- जर मला विचारले की ह्या पृथ्वीवर पूर्ण विकसित मानव ज्ञान कोठे आहे? कोणी जीवनातील गूढ प्रश्नांवर गहन विचार करून त्यांची उत्तरे शोधून काढली आहेत? तर मी भारताचे नाव घेईन.

– मैक्समूलर (जर्मन दार्शनिक)



- ज्या मनुष्याने गीतेचे थोडे जरी अध्ययन केले असेल तरी तो संसार बंधनातून मुक्त होऊन अत्यंतिक आनंदाचा अधिकारी बनतो.

– जगद्गुरु श्री आदिशंकराचार्य



- मी युरोप आणि अशियातील सर्व धर्मांचे अध्ययन केले आहे, परंतु ह्या सर्वांमध्ये मला हिंदू धर्मच श्रेष्ठ वाटतो. मला विश्वास आहे की त्याच्या समोर सर्व जगाला नतमस्तक व्हावे लागेल.

– रोमां रोलां (फ्रेंच विद्वान)



- 'गीता' एक असा पुष्पगुच्छ आहे की ज्यामध्ये वेद आणि उपनिषदांमधील सर्व आध्यात्मिक ज्ञानपुष्पे सजलेली आहेत.

– स्वामी विवेकानंद (भारत)

- "The most beautiful, perhaps the only true philosophical song existing in any known tongue."

  **- Wilhelm Von Humboldt**

- "In the morning I bathe my intellect in the stupendous and cosmogonal philosophy of the *Bhagavad Gita,* since whose composition years of the gods have elapsed and in comparison with which our modern world and its literature seems puny and trivial."

  **- Henry David Thoreau**

- "I owed a magnificent day to the *Bhagavat-Gita.* It was the first of books; it was as if an empire spake to us, nothing small or unworthy, but large, serene, consistent, the voice of an old intelligence which in another age and climate had pondered and thus disposed of the same questions that exercise us."

  **- Ralph Waldo Emerson**

- "India was the motherland of our race, and Sanskrit the mother of Europe's languages: she was the mother of our philosophy; mother, through the Arabs, of much of our mathematics; mother, through the Buddha, of the ideals embodied in Christianity; mother, through the village community, of self-government and democracy. Mother India is in many ways the mother of us all. "

  **- Will Durant (American Historian)**

- "We owe a lot to the Indians, who taught us how to count, without which no worthwhile scientific discovery could have been made!"

  **- Albert Einstein (American Scientist)**

- "If I were asked under what sky the human mind has most fully developed some of its choicest gifts, has most deeply pondered over the greatest problems of life, and has found solutions of some of them which well deserve the attention even of those who have studied Plato and Kant, I should point to India."

  **- Max Mueller (German Scholar)**

- "If there is one place on the face of earth where all the dreams of living men have found a home from the very earliest days when man began the dream of existence, it is India."

  **- Romain Rolland (French Nobel Laureate)**

- "So far as I am able to judge, nothing has been left undone, either by man or nature, to make India the most extraordinary country that the sun visits on his rounds. Nothing seems to have been forgotten, nothing overlooked."

  **- Mark Twain**

**प्रिय मुलांनो,** आपण पाहिले की विश्वविख्यात **'गीता'** ही ज्ञानाचा अगाध सागर आहे आणि त्याने प्राचीन काळापासून आजपर्यंतच्या सर्व मानव पिढयांना प्रभावित केले आहे, मार्गदर्शन केले आहे. आपणही भाग्यवान आहात की ह्या गौरवास्पद-ग्रंथ गीतेशी आपला परिचय होणार आहे.

* * *

# 'गीता' आणि भारताचा स्वातंत्र्य लढा

प्रिय मुलांनो!

भारताच्या स्वातंत्र्य लढयातील सैनिकांचे प्रेरणास्थानही ' गीता'च होते. लोकमान्य टिळक, वीर सावरकर, महर्षि अरविंद घोष, रामप्रसाद बिस्मिल, लाला लजपतराय, चंद्रशेखर आझाद, सुभाषचंद्र बोस इत्यादि सर्व थोर पुरुष गीतेने प्रेरित झाले होते. मंगल पांडे, खुदीराम बोस, सरदार भगत सिंग, राजगुरु, सुखदेव इत्यादि देशभक्त हसत-हसत फासावर चढले. त्या सर्वांच्या हातात गीता होती आणि मुखात होते –


लोकमान्य बाळगंगाधर टिळक


सुभाषचन्द्र बोस


चन्द्रशेखर आझाद


लाला लाजपत राय

वासांसि जीर्णानि यथा विहाय  
नवानि गृह्णाति नरोऽपराणि।  
तथा शरीराणि विहाय जीर्णा-  
न्यन्यानि संयाति नवानि देही।।

नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः।  
न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः।।  
अच्छेद्योऽयमदाह्योऽयमक्लेद्योऽशोष्य एव च।  
नित्यः सर्वगतः स्थाणुरचलोऽयं सनातनः।।

(गीता, २/२२-२४)

अर्थात्, आमचे शरीर एक वस्त्र आहे, वस्त्र बदलून आम्ही पुन्हा येऊ आणि लढू. तुम्ही आमच्या आत्म्याला मारू शकत नाही. आत्म्याला शस्त्राने कापता येत नाही, अग्नि, जल आणि वायु त्यास जाळू शकत नाही, ओले करू शकत नाही आणि सुकवूही शकत नाही. हा आत्मा सर्वव्यापक, अचल, स्थिर रहाणारा आणि सनातन आहे.

* * *



# ‘गीते’ बद्दल महात्मा गांधीजींचे विचार

●‘गीते’च्याच आधाराने गांधीजींनी भारताला स्वतंत्र केले आणि स्वतःला राष्ट्रपिता ही पदवी प्राप्त केली. जेव्हा कधी जीवनात ते हताश अथवा निराश व्हावयाचे तेव्हा ‘गीते’चा आश्रय घेऊन ते पुन्हा उत्साहित व्हायचे.

● ‘गीता’ माझी माता आहे. ‘गीता’ माझे बायबल वा कुराणच नाही तर प्रत्यक्ष माता आहे. ‘गीता’ जगत्-जननी आहे, ती सर्वांना तृप्त करते.’

● ‘माझी तर इच्छा आहे की ‘गीता’ केवळ राष्ट्रीय शाळांमध्येच नव्हे तर प्रत्येक शिक्षण संस्थेमध्ये शिकवली जावी. कोणत्याही हिंदू मुलाला अथवा मुलीला‘गीता’ माहीत नसणे ही शरमेची गोष्ट वाटली पाहिजे. हे सत्य आहे की ‘गीता’ विश्वधर्माचे एक पुस्तक आहे.’

* * *







।। ॐ श्री परमात्मने नमः।।

# ज्ञानामृत 'गीते'चा प्रादुर्भाव



प्रिय विद्यार्थ्यांनो!

जवळजवळ ५२०० वर्षांपूर्वी महर्षि वेदव्यासांनी संस्कृत मध्ये रचलेले 'महाभारत' हे विश्वातील श्रेष्ठ महाकाव्य आहे, की जे भारतातीलच नव्हे तर जगातील सर्व प्रचलित भाषांमध्ये अनुवादित आहे. एक लाख श्लोकांच्या महाभारतात अध्याय सहा 'भीष्मपर्वा' मध्ये भगवान श्रीकृष्णाच्या वाणीस महर्षि वेदव्यासांनी वेगळे 'श्रीमद्भगवद्गीते'च्या रुपात संकलित केले.

चला ! थोडक्यात आपण महाभारत आणि त्यातील महानायक, गीता-प्रदाता भगवान् श्रीकृष्णांच्या बद्दल जाणून घेऊया.

## ।। महाभारत कथा ।।

प्राचीनकाळी ययाति नावाचा मोठा पराक्रमी राजा राज्य करीत होता. त्याच्या दोन राण्या होत्या- देवयानी आणि शर्मिष्ठा. देवयानीला दोन पुत्र होते- यदु आणि तुर्वसु. यदुच्या नावावरून यदुवंशी राजांची परंपरा चालू झाली. ह्याच वंशात पुढे श्रीकृष्ण जन्मले.

दुसरी राणी, शर्मिष्ठा हिच्या तीन पुत्रांमध्ये पुरु सर्वात लहान, बुध्दीमान आणि महान पराक्रमी होता. ययातीने त्यासच आपला उत्तराधिकारी बनवले. ह्याच चंद्रवंशातील राजा



दुष्यंताचा पुत्र भरत.(भरताच्या नावावरून ह्या देशाला भारत हे नाव पडले). राजा भरताच्या वंशामध्ये हस्तिन नावाचा राजा झाला ज्याने हस्तिनापूरची स्थापना केली(दिल्लीच्या जवळ). ह्याच वंशात पुढे कुरु नावाचा राजा झाला ज्याच्यामुळे ह्या वंशाला कौरववंश हे नाव पडले.

आजपासून जवळजवळ ५४०० वर्षांपूर्वी हस्तिनापूरच्या विशाल साम्राज्यावर कौरववंशातील राजा शांतनु राज्य करत होता. त्याला दोन राण्या होत्या. पहिली राणी गंगादेवी व तिचा पुत्र देवव्रत, जो भीष्म ह्या नावाने ओळखला जातो. दुसरी राणी दासकन्या मत्स्योदरी होती, जी लग्नानंतर सत्यवती म्हणून ओळखली गेली. ‘मी आजीवन ब्रह्मचारी राहीन ज्यामुळे राणी सत्यवतीचा पुत्रच राज्याचा उत्तराधिकारी होईल’- अशा भीष्मप्रतिज्ञे नंतर सत्यवतीचे लग्न झाले. ह्या प्रतिज्ञेनंतरच देवव्रत ‘भीष्म’ म्हणून ओळखले गेले व आजीवन ब्रह्मचर्य पत्करुन ते कौरव वंशाचे रक्षण करत राहिले.

राणी सत्यावतीला दोन पुत्र झाले – चित्रांगद आणि विचित्रवीर्य. निपुत्रीक चित्रांगदाच्या मृत्युनंतर भीष्माने विचित्रवीर्यास सिंहासनावर बसवले आणि त्याचे लग्न काशीनरेश ‘काशिराज’ ह्याच्या कन्या ‘अम्बिका’ आणि ‘अम्बालिका’ ह्यांच्याबरोबर लावले. महर्षि वेदव्यासांच्या आशीर्वादाने अम्बिकेला धृतराष्ट्र व अम्बालिकेला पांडू नावाचे पुत्र





झाले आणि अम्बालिकेच्या दासीनेही एका पुत्रास जन्म दिला ज्याचे नाव विदुर होते. धृतराष्ट्राचा विवाह गांधार देशाची राजकन्या गांधारीशी झाला. पांडूचा विवाह कुंतीभोज राजाची कन्या कुंती आणि मद्रदेशाची राजकुमारी माद्री ह्यांच्याशी झाला. धृतराष्ट्र जन्मतःच आंधळे होते, म्हणून पितामह भीष्मांनी पांडूला राजसिंहासनावर बसवले आणि विद्वान विदुराला मुख्यमंत्री बनवले.

गांधारीला दुर्योधन, दुःशासन, दुःसह इत्यादि शंभर पुत्र आणि दुःशाला नावाची एक कन्या होती. हे सर्व भाऊ 'कौरव' ह्या नावाने प्रसिध्द झाले.

कुंतीला युधिष्ठिर, भीम व अर्जुन असे तीन पुत्र तर माद्रीला नकुल व सहदेव असे दोन पुत्र झाले. पांडूचे पुत्र असल्याने हे पाच भाऊ 'पांडव' म्हणून ओळखले गेले. हे पाचही भाऊ शूर, पराक्रमी व शीलवान होते.

सर्व कौरव व पांडव मिळून एकत्र गुरु कृपाचार्यांकडे विद्या ग्रहण करीत होते. नंतर भीष्माच्या आग्रहावरून गुरु द्रोणाचार्यांकडे हे सर्व राजकुमार धनुर्विद्या शिकले. सर्वांमध्ये धनुर्विद्येत अर्जुन, तर गदायुध्दात भीम व दुर्योधन निपुण होते.

काही वर्षे राज्य केल्यावर पांडू मरण पावला. पांडव राजसिंहासनाचे स्वाभाविक उत्तराधिकारी होते, परंतु दुर्योधनास ही गोष्ट पसंत नव्हती. पुत्र मोहामध्ये आंधळ्या झालेल्या धृतराष्ट्राचीही इच्छा होती की हे राज्य त्याचा पुत्र दुर्योधन ह्यास मिळावे.

धृतराष्ट्राचे पुत्र कौरव हे पांडवांचा द्वेष करू लागले आणि त्यांना वेग-वेगळ्या प्रकारे त्रास देऊ लागले. त्यांनी भीमाला विष दिले, लाक्षागृह तयार करून कुंतीसहित पाचही पांडवांना जाळण्याचा प्रयत्न केला. वैरभाव वाढत गेला. शेवटी पितामह भीष्मांच्या सांगण्यावरून कुरु राज्याचे दोन भाग केले गेले. कौरव हस्तिनापूरात राज्य करू लागले आणि पांडवांना एक वेगळे राज्य दिले गेले जे इंद्रप्रस्थ ह्या नावाने प्रसिद्ध झाले. अशाप्रकारे काही काल शांततेमध्ये गेला.

काही वर्षांनंतर दुष्ट दुर्योधनाच्या आमंत्रणावरून द्यूत क्रिडेमध्ये कपटी शकुनीने युधिष्ठिराला हरवले, परिणामी पांडवांचे राज्य बळकावले गेले व त्यांना तेरा वर्षाचा वनवास भोगावा लागला, ज्यामध्ये एक वर्षाचा अज्ञातवासही होता. साऱ्या अटी पूर्ण करून, वनवास संपवून परत





आल्यावरही लोभी दुर्योधनाने त्यांना राज्य देण्यास नकार दिला. पांडवांच्या वनवासादरम्यान चतुरंग सेना एकत्र करून ती मदांध झाला होता.

अंतिम प्रयत्न म्हणून योगेश्वर श्रीकृष्ण शांतिदूत बनून महाराज धृतराष्ट्राला भेटले, परंतु मदांध झालेल्या दुर्योधनाने सुईच्या टोकाएवढी भूमीही पांडवांना देण्यास नकार दिला. शेवटी युद्ध झाले. युद्धामध्ये दुर्योधनासहित सारे कौरव मारले गेले व पांडव विजयी झाले. पांडवांनी शरशय्येवर पडलेल्या पितामह भीष्मांचा आशीर्वाद घेऊन धर्म-साम्राज्याची स्थापना केली.

मुलांनो! धृतराष्ट्र आंधळा होता, तरीही सारथी संजयद्वारा युद्धाचा संपूर्ण वृतांत ऐकत होता. महर्षि वेदव्यासांद्वारा मिळालेल्या दिव्यदृष्टीमुळे संजय संपूर्ण विवरण ऐकवत होता आणि सांगत होता की हे राजन् ! ह्या युध्दामध्ये पांडवच विजयी होतील, कारण भगवान श्रीकृष्ण त्यांच्याबरोबर आहेत. राजन्! जेथे भगवंत आहेत व अनुरागी भक्त आहे तेथेच ऐश्वर्य, विजय व ईश्वरीय विभूति आहे. भगवान श्रीकृष्णाने महाभारत युध्दात आपला प्रिय सखा - मित्र –शिष्य असलेल्या अर्जुनाचा सारथी बनून त्यास ऐश्वर्य, विजय, विभूति, साम्राज्य

इत्यादि सर्व उपलब्ध करून दिले. हीच थोडक्यात महाभारताची कथा आहे. ह्याच घडलेल्या घटनेच्या माध्यमातून आणि त्यातील पात्रांना प्रतिकात्मक बनवून भगवान श्रीकृष्णांनी गीताज्ञानाची उत्पत्ति केली, उपदेश केला. महाभारतातील ऐतिहासिक युध्द हे ऐहिक आहे, तर 'गीते' तील युध्द अध्यात्मिक आहे. ज्यामध्ये एकाच मनुष्याच्या अंत:करणात स्थित असलेल्या चांगल्या व वाईट प्रवृत्तींचा संघर्ष आहे ज्याचे चित्रण 'गीते' मध्ये केले गेलेले आहे.

**प्रिय विद्यार्थ्यांनो,**

आता आपल्याला महाभारताचे महानायक भगवान श्रीकृष्णांबद्दल जाणण्याची उत्सुकता लागली असेल.

## परमात्मा, भगवान, इष्ट, महापुरुष------- योगेश्वर श्रीकृष्ण!

भगवान श्रीकृष्णाला संबोधित ह्या सर्व उपाधि एकच आहेत, विशेषणे आहेत, ज्या साधनेच्या पूर्णतेनंतर ईश्वर- प्राप्तीच्या स्थिति आहेत. श्रीकृष्ण एक पूर्ण योगी होते, त्यांनी बालपणी गुरु महर्षि सांदिपनींच्या आश्रमात राहून सेवा आणि साधनेद्वारे सर्व विद्यांमध्ये पारंगत होऊन योगेश्वराची स्थिति प्राप्त केली व आजीवन मानव कल्याण करीत राहिले. योगेश्वर तो असतो जो पूर्ण योगी असतो, महापुरुष असतो, सद्गुरु असतो आणि आपल्या अनुरागी शिष्यामध्येही ही क्षमता आणण्यास समर्थ असतो. श्रीकृष्णांच्या अगणित लीला आहेत, त्यामध्ये सर्वात मुख्य आहे - त्यांच्या मुखातून प्रसारित झालेले 'गीताज्ञान'. त्यांनी पूर्ण विश्वातील मानवास अविनाशी योग - 'गीताज्ञान' प्रदान करून, माणसा - माणसांसाठी ईश्वर प्राप्तीच्या साधनेस सुलभ केले आहे.

वस्तुत: योगेश्वर श्रीकृष्णाने मोहग्रस्त अर्जुनास अविनाशी योग - 'गीते'व्दारे, युद्धासाठी प्रवृत्त करून शाश्वत विजय मिळवून दिला. ऐहिक युद्धामध्ये तर विजय-पराजय-विजय असा क्रम चालतच राहतो परंतु गीतेतील युद्धाद्वारे शाश्वत विजय प्राप्त होतो की ज्याच्यानंतर पराजय नसतो.

गीता एक संपूर्ण साधनात्मक ग्रंथ आहे. गुरु-शिष्य संवाद आहे. सद्गुरु आहेत - महापुरुष योगेश्वर श्रीकृष्ण आणि शिष्य आहे - एक अनुरागी साधक अर्जुन! ---- आपणा सर्वांची अनुरागपूर्ण तळमळच 'अर्जुन' आहे.

मुलानों, लक्षात घ्या! संपूर्ण गीतेतील एकही श्लोक बाहेरील युद्धाचे समर्थन करीत नाही. 'गीते' मध्ये वर्णिलेले युद्धक्षेत्र हे कोणतेही भूक्षेत्र (भूखंड) नाही.

गीता वक्ता श्रीकृष्णाने स्वतःच सांगितले आहे की- ''इदं शरीरं कौन्तेय क्षेत्रमित्यभिधीयते।''–कौन्तेय! हे शरीरच एक क्षेत्र आहे (वाचा 'यथार्थ गीता'१३/१). हे युद्ध कोण्या अनुरागी साधकाच्या अंतःकरणात चालणाऱ्या चांगल्या व वाईट प्रवृत्तींमधील संघर्ष आहे. त्यामधे सफलता म्हणजेच विजय होय.

योगेश्वर श्रीकृष्णाने महाभारतातील पात्रांचे उदाहरण देऊन, त्यांना उद्देश्य बनवून गीतेचा उपदेश दिला आहे. हे एकाच अनुरागी साधकाच्या अंतःकरणात चालणाऱ्या युद्धाचे (द्वंद्वाचे) चित्रण आहे, ज्यामध्ये विद्या-अविद्या, प्रकृति-पुरुष, सजातीय-विजातीय प्रवृत्ति, दैवी व आसुरी वृत्तींना, ह्या घडलेल्या घटनेच्या पात्रांच्या रुपात संबोधित करून समजावले आहे. अंतःकरणातील विकारांचे आणि परमात्म्याच्या प्राप्तीच्या साधनांचे चित्रण केले आहे.

गीतोक्त युद्धामध्ये विजयी झालेल्या साधकास शाश्वत विजय प्राप्त होतो. असा साधक जन्म-मरणाच्या चक्रातून मुक्त होऊन त्यास परमेश्वराचे परमधाम प्राप्त होते.

मुलांनो! हे आपल्या गुरुजनांकडून व माता-पित्यांकडून समजून घ्या आणि 'यथार्थ गीता' वाचा.

* * *



# सनातन सत्य – शिकवण

## (सनातन सत्य आहे -'एकमात्र परमात्मा' त्यास जाणणे)

सर्व विश्वातील तुम्ही मुले भाग्यवान आहात कारण तुमचे 'गीते'शी नाते जुळत आहे. भारतीय मुलांना विशेष गौरवास्पद ही गोष्ट आहे की त्यांचा जन्म 'गीते'चे प्रगटस्थान असलेल्या आर्यावर्त भारतात झाला. प्राचीन, वैदिक काळापासून आजपर्यंत भारतीय अध्यात्म, दर्शनशास्त्र तसेच संस्कृतीने पूर्ण विश्वाला प्रभावित व आकर्षित केले आहे. भारत राष्ट्र हे धर्म, साहित्य, कला, विज्ञान व संगीत इत्यादीचे एक महान सांस्कृतिक केंद्र आहे आणि निःसंदेह 'धर्म' त्याचा प्राण आहे.

पूर्ण विश्वातील सर्व संस्कृतींनी भारतीय धर्म व दर्शनशास्त्राला स्वीकारले आहे व अंगीकारले आहे. इतर सर्व देशांमधील विचारवंतक, विद्वान, साहित्यकार व इतिहासकारांनी ह्यापासून प्रेरणा घेतली आहे, त्यास आपलेसे केले आहे व त्याचा उल्लेखही केला आहे.

विश्वातील सर्व धर्मांमध्ये भारताच्या अध्यात्म विद्येचाच स्रोत सापडतो आणि ह्याच अध्यात्म विद्येच्या जोरावर भारत विश्वगुरु ठरला आणि आजही आहे. ते ज्ञान जसेच्या तसे श्रीमद्भगवद्गीता भाष्य 'यथार्थ गीते' मध्ये आजही सुरक्षित आहे

भारतातील प्रिय मुलांनो व विद्यार्थ्यांनो! तुम्ही सर्व ह्या राष्ट्राचे भावी नागरिक आहात आणि तुमचे हे कर्तव्य आहे की आपल्या देशाच्या ह्या आध्यात्मिक ठेवेस व गौरवशाली परंपरेस तुम्ही जाणून घ्यावे, जीवनात त्याचे पालन करावे आणि त्याचे दूत बनून पूर्ण विश्वामध्ये हे महान ज्ञान पसरवावे.

* * *

**— संदेश —**

सत्य वस्तुचा तीनही काळामध्ये अभाव नसतो आणि असत्य वस्तूचे अस्तित्व नसते. एक परमात्माच तीनही काळांमध्ये सत्य आहे, शाश्वत आहे, सनातन आहे.

**- स्वामी श्री अड़गड़ानन्दजी महाराज**

### भारताचा प्राचीन गौरव– 'सनातन धर्म'

आर्यावर्त भारत राष्ट्राच्या दर्शनशास्त्र व अध्यात्मामध्ये अग्रस्थानी आहे-धर्म आणि ह्या धर्मास 'सनातन धर्म' म्हटले जाते. सनातनचा अर्थ-जो आधीही होता, आताही आहे आणि पुढेही राहील, त्यास आपल्या वेद व उपनिषदांनी परमात्मा, आत्मा वा ब्रह्म म्हटले आहे. ती

ज्योर्तिमय आहे, त्यापासूनच ब्रह्मांडाची उत्पत्ति झाली आणि त्यामधेच विलयही होतो. हा क्रम निरंतर चालू असतो. हाच सृष्टीचा नियम आहे.

- ह्या सनातन परमात्म्यास, आत्म्यास वा ब्रह्मास जाणणे, त्याचे प्रत्यक्ष दर्शन करणे आणि त्यास धारण करणे हाच **'सनातन धर्म'** होय.
- एक परमात्माच शाश्वत आहे, त्याच्याशिवाय कोणाचेही अस्तित्व नाही. ह्या अस्तित्ववान, अविनाशी परमात्म्याच्या श्रद्धावान उपासकास **'आर्य'** म्हणतात.
- भगवंत म्हणतात की, मी सर्वांच्या हृदयात सामावलेला असून सदा तेथेच निवास करतो. **'सर्वस्य चाहं हृदि सन्निविष्टो'** (गीता, १५/१५)

ह्या हृदयस्थित ज्योतिर्मय परमात्म्याच्या उपासकास **'हिंदू'** म्हणतात.

सृष्टीचे आदि धर्मशास्त्र 'गीते 'मधून ही तीन नावे - सनातन, आर्य व हिंदू घेतली गेली आहेत. तिन्हींचा आशय एकच आहे. तीनही परम पवित्र आहेत. ऋषि-महर्षींनी चिंतन करून वेळोवेळी ही नावे दिलेली आहेत.

तेव्हा ह्या विश्वातील जो कोणी मनुष्य त्या सनातन, शाश्वत, हृदयस्थित परमात्म्यास प्राप्त वा धारण करण्यासाठी प्रयत्नशील आहे; तो सनातन धर्माचा अनुयायी आहे, उपासक आहे.

ह्या सनातन धर्माचे संपूर्ण रुपाने श्रीमद्‌भगवद् गीतेमध्ये वर्णन केलेले आहे.

**चला, त्यास क्रमा-क्रमाने जाणून घेऊया!.....**

## चिर प्राचीन व चिर नवीन प्रश्न

प्रिय मुलांनो! सृष्टीच्या आरंभापासून, चिर-प्राचीन काळापासूनच मानवाला जिज्ञासा होती की-

- सत्य कोणते? मी कोण आहे? माझ्या जीवनाचे उद्दिष्ट कोणते?
- ह्या सृष्टीची (ब्रह्मांडाची) निर्मिती, त्याचे पालन व परिवर्तन करणारी सत्ता कोणती?
- काय ह्या सर्वोच्च सत्तेस जाणणे शक्य आहे? जर आहे तर
- त्या सत्तेस जाणण्याचा अथवा प्रत्यक्ष अनुभवण्याचा विधि कोणता?

सृष्टीच्या प्रारंभापासूनच आर्यावर्त भारतातील सत्यशोधक ऋषि-मुनींनी निरंतर चितंन-साधना करून ह्या सर्व प्रश्नांचे उत्तर शोधले आहे आणि सत्यास प्रत्यक्ष जाणले आहे.

वस्तुत: जीव-जगत आणि अध्यात्माशी (आत्मा वा परमात्मासंबंधीचे ज्ञान) संबंधित सर्व प्रश्नांची उत्तरे व जिज्ञासांचे निराकरण भारतीय चिंतन-दर्शन 'गीते' मध्ये उपलब्ध आहे.

जिज्ञासु विद्यार्थ्यांनो! वर लिहिलेले सर्व प्रश्न तसेच जिज्ञासा चिर-नवीनही आहेत,

तुमचेही आहेत! आणि असायलाच हवेत! कारण तेच तुम्हालाही त्या परमसत्याचा शोध घेण्यास प्रेरित करतात,

**भारतीय ऋषि-मुनींनी शोध घेतला आहे की-**

- एक परमात्माच सत्य आहे! शाश्वत आहे! सनातन आहे! आणि तो हृदयामध्ये निवास करतो!
  परमात्मा **सत्य** आहे म्हणजे-वास्तविक आहे.
  परमात्मा **शाश्वत** आहे म्हणजे-अजर, अमर, अविनाशी, अनादि, अनंत आहे.
  परमात्मा **सनातन** आहे म्हणजे- सतत, अनादिकाळापासून, नित्य, निरंतर आहे.
- तो एक 'परमात्मा'च 'सर्वोच्च सत्ता'आहे ज्यास आत्मा,ब्रह्म, तत्व, ईश्वर, गॉड अथवा खुदाही म्हणतात, ही सर्व नावे त्याच परमात्म्याला संबोधणारी पर्यायवाची नावे आहेत, परमात्मदर्शी महापुरुषांव्दारे आपल्या-आपल्या देशकाळातील भाषेनुसार नामकरण झालेले आहे
- तो परमात्मा वा ब्रह्म 'ज्योतिर्मय' आहे, त्याच्या एका अंशमात्राने संपूर्ण ब्रह्मांडाचे-सृष्टीचे सृजन, पालन व परिवर्तन होत असते, हाच सृष्टीचा नियम आहे,
  (गीता, १३/१७, ९/१७)
- आपणा सर्वांस त्याच एका परमात्म्याने घडविलेले आहे आणि आपण त्याचेच पवित्र 'अंश' आहोत.
  (गीता, १५/७)
- तो ज्योतिर्मय परमात्मा सर्व प्राण्यांच्या हृदयामध्ये निवास करतो.
  (गीता, १३/१७, १८/६१)
- त्या परमात्म्यास 'जाणणे' शक्य आहे, त्याचा प्रत्यक्ष अनुभवही घेणे शक्य आहे. (ह्या बद्दलच्या संपूर्ण माहितीसाठी गीता भाष्य 'यथार्थ गीते'चे वाचन आवश्यक आहे.) (गीता, ११/५४, २/२९)
- त्या परमात्म्याच्या दर्शनाबरोबरच (परमात्मदर्शन, आत्मदर्शन, ब्रह्मदर्शन वा तत्वदर्शन) आपले सर्व प्रश्न नाहीसे होतात, आणि शेष राहतो-केवळ तो परमात्मा आणि त्याचा परिणाम आहे-परमात्मस्थिति, तत्वस्थिति आणि शाश्वतधाम, परमानंद व मोक्षाची प्राप्ति.हेच आपल्या जीवनाचे उद्दिष्ट आहे.
- वर्तमानातील 'महापुरुषां' व्दारेच (परमात्मस्थित सद्गुरुंव्दारेच) धर्माची/धर्माचरणाची जागृति, शाश्वतधाम, परमानंद व मोक्षाची प्राप्ति संभव आहे. तेव्हा कोणा सद्गुरुंना शरण जाणे , संरक्षण मिळविणे आणि त्यांची सेवा करणे आवश्यक आहे. (गीता,१४/२७,४/३४)

**विशेष**– ह्यासाठी कोणालाही 'गुरु' मानू अथवा बनवू नका, कारण सद्गुरु शोधून सापडत नाहीत आणि ना त्यांची काही बाह्य ओळख असते. ह्यासाठी एका परमात्म्यावर

श्रद्धा स्थिर करून ॐचा जप करावा. सतत करत रहावा. परमात्माच प्रेरणा देऊन, तुमच्या आत्म्याला जागृत करून सद्गुरुंशी भेट घडवून देईल.

ह्या लेखन व वर्णनाखेरीज बाकी सर्व क्रियात्मक आहे, जे फक्त आचरणानेच आपण जाणू शकतो. तेव्हा ईश्वरीयवाणी 'गीते'ची यथावत् व्याख्या 'यथार्थ गीता' वाचून, समजून आणि त्याप्रमाणे आचरण करूनच आपण ईश्वरापर्यंत पोहोचू शकतो.

प्रिय विद्यार्थ्यांनो, 'यथार्थ गीते'च्या नियमित अध्ययनाने तुम्ही तुमच्या जीवनात उत्तम शिक्षण, चांगली मिळकत, सफलता, सुख-समृद्धि, नाव-यश आणि मोक्षसुद्धा प्राप्त करू शकता.

* * *

**चला, आता धर्म आणि धर्मशास्त्राबदल जाणून घेऊया–**

**आत्तापर्यंत तुम्ही जाणून घेतलेत की–**

- **सत्य** – केवळ 'एक परमात्मा' च सत्य आहे, शाश्वत आहे, सनातन आहे.

**— तेव्हा —**

- **धर्म** – त्या एका परमात्म्यामध्ये श्रद्धा स्थिर करून त्यास जाणणे, प्रत्यक्ष पहाणे व धारण करणे हाच 'धर्म' होय.
- **धर्मशास्त्र** – त्या परमात्म्यास जाणण्याच्या व धारण करण्याच्या क्रियात्मक व अनुशासनात्मक नियमांच्या ईश्वरीय वाणीचे संकलन म्हणजेच धर्मशास्त्र.

**— म्हणून—**

सृष्टीच्या प्रारंभापासून प्रसारित झालेली योगेश्वर श्रीकृष्णाची वाणी 'श्रीमद्भगवद्गीता' हेच विश्वाचे आदि धर्मशास्त्र आहे.

* * *

# विश्वाचे आदि धर्मशास्त्र 'श्रीमद्‌भगवद्‌गीता'


भगवंताच्या विराट रूपाचे दर्शन हृदयामध्ये केले जाते, साधनेने ते शक्य आहे।


एका परमात्म्याच्या भक्तीशिवाय जो कल्याण होण्याची अपेक्षा करतो, तो मूर्ख असतो.


परमात्माच सत्य आहे, ॐ चा जप करावा.


अहुरमज्दा एक ईश्वरच सत्य आहे.


एका ईश्वराला शरण, त्यावर श्रद्धा व त्याची साधना.


एका अल्लाशिवाय कोणतेही सत्य नाही.


एक ओंकार सदगुरु प्रसादि।


अविनाशी सर्वज्ञ पदास प्राप्त केले.


आत्मा सत्य आहे, कठोर तपस्येने ह्याच जन्मात त्यास जाणणे शक्य आहे.


परमेश्वर जेव्हा कृपा करतात, तेव्हा शत्रू मित्र होतात, विपत्ति संपत्ति होते.

भारतातील प्राचीन आणि वैदिककालीन ऋषि-मुनिंनी ज्या सत्याचा शोध घेतला होता व त्यांना आत्मसाक्षात्कार झाला होता त्याचे संपूर्ण वर्णन 'गीते'मध्ये उपलब्ध आहे.

भगवान श्रीरामांचा जन्म झाला (लाखो वर्षांपूर्वी-त्रेता) त्याच्याही हजारो वर्ष आधीच्या ऋषि-मुनिंनी सत्याचा शोध घेऊन त्या एका परमात्म्याला प्रत्यक्ष जाणले आणि भारतातील अरण्यांमध्ये आश्रम स्थापन करून शिष्यांच्या हृदयात तो अनुभव अव्याहत जागृत करीत परंपरेने त्यास जतन केले.

त्याच सत्यास आजपासून जवळजवळ ५२०० वर्षांपूर्वी भगवान श्रीकृष्णांनी आपल्या श्रीमुखातून प्रसारित केले

**इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम्।**
**विवस्वान्मनवे प्राह मनुरिक्ष्वाकवेऽब्रवीत्।। (गीता, ४/१)**

भगवान श्रीकृष्ण म्हणतात, "मी हा अविनाशी योग आरंभी सूर्याला सांगितला. सूर्याने मनूला सांगितला व मनूने इक्ष्वाकुला सांगितला."

'महाराज मनू' ह्या पृथ्वीवरील प्रथम मानव होते. संपूर्ण विश्व त्यांच्यापासूनच उत्पन्न झालेले आहे, म्हणून सर्वांना मानव (मनूज) म्हणतात.विश्वातील विविध भाषांमध्ये आदम-हव्वा, नूह इत्यादि अनेक नावांनीही त्यांना संबोधले गेले आहे. महाराज मनूंना गीता

ज्ञान,त्यांचे पिता सूर्याकडून वंश-परंपरेने मिळाले, जे कालांतराने जवळजवळ विस्मृत होऊन गेले होते. त्याचेच पुनःप्रसारण कुरुक्षेत्रात (भारत) भगवान् श्रीकृष्णांव्दारे झाले.

मुलांनो, येथे हा प्रश्न पडणे स्वाभाविक आहे, जो योगेश्वर श्रीकृष्णाच्या अनुरागी शिष्यास, अर्जुनासही पडला होता, "भगवंत! जो अविनाशी पुरातन योग आपण मला सांगत आहात, तो कल्पाच्या आंरभी आपणच सूर्याला सांगितलात हे मी कसे मानू? कारण आपला जन्म तर आता झाला आहे." हेच तर गीतेचे लालित्य आहे, दर्शनशास्त्र आहे. हे रहस्य पूर्ण जाणण्यासाठी अवश्य वाचा 'यथार्थ गीता'– अध्याय ४, श्लोक १ ते १० आणि त्यांचा अर्थ.

'श्रुत' परंपरेने प्राप्त झालेल्या ह्या अविनाशी योगास-'गीते' स महाराज मनूने आपल्या स्मृतीमध्ये धारण केले आणि स्मृतीची परंपरा चालू केली. हीच खरी विशुद्ध मनुस्मृति होय. गेल्या काही शंभर वर्षांपासून जी मनुस्मृति प्रसारात होती ती स्टेट पीरियड मधील व्यवस्थापकांची देणगी होती, ती समाजात उच्च-नीच, स्पृश्य-अस्पृश्य, जात-पात इत्यादींच्या भिंती उभ्या करून आपले हित साधण्याची केवळ एक व्यवस्था मात्र होती, 'धर्म' तर कदापि नव्हती.

(आज त्या स्मृतींचा तर काही ठाव-ठिकाणा राहिला नाही परंतु त्याचे दुष्परिणाम मात्र भारत आजही भोगत आहे. चला! संकल्प करूया की आपण सर्वांनी त्यांना मुळापासून नष्ट करून समरस समाजाची स्थापना करूया.)

गीतेमध्ये भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला म्हटले आहे की तुला मी तेच सनातन सत्य सांगत आहे जे पूर्वीच्या विद्वानांनी शोधले आहे, पाहिले आहे आणि प्राप्त केले आहे- **'ऋषिभिर्बहुधागीतम्'** (गीता, १३/४) आणि भविष्यात होणारे महापुरुषही तेच सत्य प्राप्त करतील व सांगतील.

श्रीकृष्णकालीन महर्षि वेद व्यासांच्या आधी कोणतेही शास्त्र पुस्तक रुपात नव्हते. श्रुतज्ञान घेऊन, स्मृतिज्ञानाची (ऐकून लक्षात ठेवण्याची) परंपरा होती. महर्षि व्यासांनी, ऐकून स्मृतीमध्ये धारण करण्याच्या परंपरेला संपुष्टात आणले, चारही वेद, ब्रह्मसुत्र, पुराण, महाभारत, भागवत व गीता संकलित (लिपिबद्ध) करून त्यास शास्त्राचे स्वरूप प्रदान केले. शेवटी शास्त्रकार महर्षि वेदव्यासांनी स्वतःच निर्णय दिला की गीता 'धर्मशास्त्र' आहे.

- **सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनन्दनः।**

  सर्व उपनिषदांचे सार जे 'गीता' आहे ते गोपाल कृष्णाने जणूकाही दूधासारखे दोहून बाहेर काढलेआहे.

- **एकं शास्त्रं देवकीपुत्र गीतम्।**

  'गीता' हे एकमेव शास्त्र आहे जे भगवंताचे गायन आहे.

- **गीता सुगीता कर्तव्या किमन्यैः शास्त्रविस्तरैः।**
  **या स्वयं पद्मनाभस्य मुखपद्माद्विनिःसृता।।** (महाभारत, भीष्मपर्व, ४३/१)

'गीते'चेच चांगल्याप्रकारे गायन केले पाहिजे अर्थात त्याचेच चांगल्याप्रकारे श्रवण, कीर्तन, पठण, मनन करून त्यास धारण केले पाहिजे, मग अन्य शास्त्रांच्या विस्तारात जाण्याची काय गरज आहे. कारण ती स्वत: पद्मनाभ भगवंताच्या श्रीमुखातून प्रसारित झालेली आहे.

- **'सर्वशास्त्रमयी गीता'**– (महाभारत, भीष्मपर्व, ४३/२)

  सर्व शास्त्रांचे सार 'गीता'आहे.

**— तेव्हा —**

जवळजवळ ५२०० वर्षांपूर्वी भगवान श्रीकृष्णाच्या श्रीमुखातून प्रसारित झालेली वाणी 'गीता' हेच मानवमात्राचे धर्मशास्त्र आहे. कारण-आज प्रचलित असलेले सर्व धर्म, पंथ व संप्रदाय श्रीकृष्णाच्या काळी नव्हते. त्यानंतर हजारो वर्षांच्या पश्चात ज्या महापुरूषांनी एक ईश्वरच सत्य आहे असे सांगितले ते सर्व गीतेचेच संदेशवाहक आहेत. जगातील सर्व महापरूष एकच आहेत. वैदिक काळातील महर्षिगण, भगवान श्रीराम व श्रीकृष्ण, महर्षि मूसा, महात्मा जरथुस्त्र, भगवान महावीर, गौतम बुद्ध, ईसा मसीहा, मुहम्मद साहेब, आद्यशंकराचार्य, योगी मछींद्रनाथ, संत कबीर, तुलसीदास, गुरुनानक, स्वामी दयानंद सरस्वती,श्रीरामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद आणि स्वामी परमानंदजी इत्यादि सर्व महापुरुषांनी गीतेतील 'एक ईश्वरवादाचा' संदेशच आपल्या-आपल्या देश काळातील भाषेमध्ये दिला आहे आणि ह्या ईश्वरास ब्रह्म, परमात्मा, आत्मा, अहुरमज्दा, गॉड, खुदा, अल्लाह इत्यादि पर्यायवाची नावांनी संबोधित केले आहे.

ह्याच सत्याचा प्रतिध्वनी चारही वेद, उपनिषदे, रामायण, अवेस्ता, जैन आणि बौद्ध साहित्य 'महापरिनिब्बानसुत्त', बायबल, कुराण, मानस, कबीरवाणी- साखी, गुरुग्रंथ साहेब इत्यादि धार्मिक ग्रंथांमध्ये आहे, जे गीतेचाच विविध भाषा-शैलींमध्ये विस्तार आहेत. म्हणून भारत विश्वगुरु आहे.

* * *

## 'श्रीमद्भगवद्गीते' ची यथावत् सुबोध व्याख्या

# ॥ यथार्थ गीता ॥

## मानवमात्राचे एकमेव धर्मशास्त्र



**प्रिय मुलांनो!**

कालांतराने 'गीते'चा आशय लुप्त होत चालला होता, पुसट होऊन गेला होता, त्यामुळे गीतेच्या नावावर तमाम धार्मिक तशाच सामाजिक वाईट रीति वाढीस लागल्या होत्या किंवा सामाजिक व्यवस्थेच्या नावावर स्वार्थापोटी त्यांना वाढविण्यात आले होते. समाजामध्ये जात-पात, वर्ण-व्यवस्था, उच्च-नीच, धर्मांतरणाची विकृत व्यवस्था मूळ पकडून बसली होती. अशा संक्रमण काळात प्रकाश-स्तंभाच्या रुपात 'यथार्थ गीते'चे प्रकाशन झाले आहे. चला! तर 'यथार्थ गीता' थोडक्यात जाणून घेऊया.

**५२०० वर्षांच्या मोठ्या कालावधीनंतर स्वामी श्री अड़गड़ानन्दजी महाराजांनी श्रीकृष्णाचा दिव्य संदेश असलेली 'गीता' जी संस्कृतमध्ये आहे, तिचे सरळ, सोप्या हिंदी मध्ये 'यथार्थ गीते'च्या रुपात विवरण केले आहे.** इश्वरीय प्रेरणेने १९८३ साली प्रकाशित झालेली ही 'यथार्थ गीता' आजच्या मानवमात्राचे दिशा निर्देशन करीत आहे.

भगवान श्रीकृष्णाचा आशय यथा-अर्थ (जसाच्या तसा) व्यक्त केल्यामुळे ह्याचे नाव 'यथार्थ गीता' आहे. महाराजांनी 'यथार्थ गीता'प्रस्तुत करून सत्याच्या नावावर पसरलेल्या आणि सत्यासारख्या प्रतीत होणाऱ्या तमाम वाईट रीतींचे निवारण करून आपणा सर्वांना कल्याणाचा मार्ग दाखविला आहे.

स्वामीजींच्याव्दारा लिहिली गेलेली 'यथार्थ गीता' हा एक संपूर्ण साधनग्रंथ आहे. यथार्थ गीतेचे ३-४ वेळा वाचन आणि मनन, आपल्या सर्व शंकांचे व जिज्ञासांचे निराकरण करून, ईश्वराची साधना व ईश्वराच्या साक्षात्कारापर्यंतचे अंतर निश्चित करविते. गीतेचे नियमित अध्ययन करून सर्वजण जीवनामध्ये ऐश्वर्य, विजय आणि विभूति निश्चितपणे प्राप्त कराल.

आपण आप-आपल्या कार्यक्षेत्रात अग्रेसर रहाल.जगातील भौतिक सुख साधनांची प्राप्ति होईल आणि 'मोक्ष' ही मिळेल. 'मोक्ष' म्हणजे जन्म-मृत्यूच्या (जन्म-मरण-जन्माचे चक्र जे अतिशय दुःखद् आहे) बंधनातून मुक्ति आणि स्वर्गलोकाची (ईश्वरत्वाची) प्राप्ति. हेच आहे 'गीतेतील पाथेय'- नरापासून नारायणापर्यंत, मानवापासून महामानवापर्यंत व पुरुषापासून महापुरुषापर्यंतचा प्रवास!

'गीता' कोणा विशेष व्यक्ति, वर्ग, समुदाय, संप्रदाय, देश-काळ-पंथाचा ग्रंथ नसून हा प्रत्येक देश, समुदाय, संप्रदाय, प्रत्येक स्त्री-पुरुष व मुलासाठी आहे. तेव्हा 'यथार्थ गीता' हा साधनग्रंथ पूर्ण विश्वातील प्रत्येक घरामध्ये आणि प्रत्येक व्यक्तीकडे असला पाहिजे. विद्यार्थ्यांकडे आणि सर्व मुलांकडे असला पाहिजे. तेव्हाच आपण त्याचे अध्ययन व मनन करून त्याप्रमाणे आचरण करू शकाल आणि विश्वाच्या ह्या अमूल्य ठेवीला सुरक्षित ठेऊ शकाल.

कालजयी कृति- 'यथार्थ गीता' भारतातील सर्व प्रमुख भाषांमध्ये- मराठी, पंजाबी, गुजराथी, उर्दू, संस्कृत, उडिया, बंगाली, तामिळ, तेलगू, मल्याळम्, कन्नड तसेच आसामी आणि आंतरराष्ट्रीय भाषा- इंग्रजी, जर्मन, फ्रेंच, नेपाळी, स्पॅनीश, नॉर्वेजीयन, चायनीज, फारसी, डच, इटालियन व रशीयन ह्या भाषांमध्ये अनुवादित झालेली आहे.

'यथार्थ गीते'चा उत्कर्ष विसाव्या शतकातील महान रचना, घटना तसेच प्राप्ति आहे. ती वेळ आता दूर नाही की जेव्हा 'यथार्थ गीता'रुपी अक्षय वटवृक्षाच्या सावलीत संपूर्ण विश्वातील मानवता विसावा घेईल.

'गीते'स यथावत् समजून घेण्यासाठी, चांगल्या प्रकारे जाणण्यासाठी 'यथार्थ गीता' तीन-चार वेळा अवश्य वाचा.

ॐ शान्तिः! शान्तिः!! शान्तिः!!!

# गीता महिमा गाणे –गुणगुणत रहा!

पाठ गीता का सदा, करना बड़ा सत्कर्म है।
पाठ गीता का सदा, करना ही मानव धर्म है।।
ज्ञान गीता का सदा, हृदय में धरना चाहिये।
मनुष्य को हर रोज गीता पाठ करना चाहिये।।

ज्ञान गीता का जिन्हें, दुष्कर्म वो करते नहीं।
ज्ञान गीता का जिन्हें, वो मौत से डरते नहीं।।
इसलिये नित ज्ञान गीता का सुमिरना चाहिये।
मनुष्य को हर रोज गीता पाठ करना चाहिये।।

अमर हूँ मैं आत्मा, गीता सिखाती है मुझे।
अजर अमर अद्वैत हूँ, गीता बताती है मुझे।।
इसलिये मौत से हमें डरना नहीं चाहिये।
मनुष्य को हर रोज गीता पाठ करना चाहिये।।

शुद्ध चेतन आत्मा, द्रष्टा सकल जगजाल का।
इच्छुक हूँ भगवत्कृपा का, भय नहीं अब काल का।।
ऐसा निश्चय धारकर, निर्भय विचरना चाहिये।
मनुष्य को हर रोज गीता पाठ करना चाहिये।।

कृतकृत्य हुए वे लोग जिन्हें, भगवत् गीता प्यारी है।
है मानव जन्म सफल उनका, वे मुक्ति के अधिकारी हैं।।
है सभी शास्त्रों की जननी, वेदों का सार भरा इसमें।
जो गीता तथ्य विचार लिये, वे जग के परम सुखारी हैं।।

सत्कर्म धर्म और ज्ञान-ध्यान का, यथार्थ पथ दर्शाया है।
गीता है प्राण समान उन्हें, जो सज्जन तत्व विचारी हैं।।
श्रीभगवान् के मुख की वाणी है, दुःखचिन्ता हरनेवाली है।
गीता यथार्थ की शरण में हैं जो, उसके रक्षक प्रणधारी हैं।।

* * *

# धर्म, धर्मशास्त्र आणि धर्म सिद्धान्त

जिज्ञासू मुलांनो, आतापर्यंत तुम्ही हे जाणले असेल की-

- **सत्य :** केवळ एक परमात्मा, ईश्वर, गॉड वा खुदाच 'सत्य'आहे.
- **धर्म :** त्या एका परमात्म्याला धारण करणे हाच 'धर्म' होय.
- **धर्मशास्त्र :** 'गीता'च मानवमात्राचे एकमेव आदि 'धर्मशास्त्र'आहे.

**— तेव्हा —**

धर्म सिद्धांतही एक आहे, ज्यामध्ये ईश्वर एक, त्यास प्राप्त करण्याची क्रिया एक, मार्गामध्ये कृपा एक तसेच परिणामही एकच असतो, तो म्हणजे ईश्वर दर्शन व ईश्वरत्वाची प्राप्ति. हे सर्व सिद्धांत, एकमेव शास्त्र असलेल्या 'यथार्थ गीते'त संपूर्णपणे वर्णिलेले आहेत.

## धर्म-सिद्धान्त – एक

आता तुमच्या सर्वांच्या माहितीसाठी व तुमच्या ज्ञानात भर घालण्यासाठी 'गीते'तील प्रमुख धर्म-सिद्धांत नमूद करीत आहोत, जे अनादिकाळापासून चालत आलेले आहेत, शाश्वत व सनातन आहेत. ह्या धर्म-सिद्धांताचे संपूर्ण वर्णन 'यथार्थ गीते' मध्ये केले गेलेले आहे. तेव्हा आपणा सर्वांचे, विश्वातील समस्त मानव मात्राचे धर्मशास्त्र श्रीमद्भगवद्गीता भाष्य 'यथार्थ गीता' आहे, हेच सृष्टीचे आदिशास्त्र आहे.

**श्रीभगवानुवाच**

**इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम्।**

**विवस्वान्मनवे प्राह मनुरिक्ष्वाकवेऽब्रवीत्।।** (गीता, ४/१)

भगवान श्रीकृष्ण म्हणाले की हा अविनाशी योग मी आरंभी सूर्याला सांगितला, सूर्याने आपला पूत्र मनू ह्यास सांगितला व त्या योगानुसार एक परमात्माच सत्य आहे, तोच सर्वत्र व्यापलेला आहे. योगसाधनेव्दारे त्या परमात्म्याचे दर्शन, स्पर्श आणि त्यामध्ये प्रवेश सह-जपणे मिळविता येतो. गीतेचाच सिद्धांत आहे की एक परमात्माच सत्य आहे व विश्वातील सर्व विद्वान, संत, महात्मे हेच सांगत आलेले आहेत, परंतु त्यास प्राप्त कसे करायचे? ती संपूर्ण विधि गीतेमध्ये सुरक्षित आहे.

सृष्टीच्या प्रांरभी जे शास्त्र भगवंतानी सांगितले-ते लुप्त झाले होते ते पुन्हा भगवंतांनीच व्दापारमध्ये कुरुक्षेत्रावर (भारतामध्ये) अर्जुनाला सांगितले. शिक्षणावर प्रतिबंध लागल्यामुळे धर्माच्या नावावर विविध रूढि व शास्त्राच्या जागी सामाजिक व्यवस्था प्रचलनात आल्या होत्या. मूळ संस्कृतमधील 'गीता' ७०० श्लोकांमध्ये सुरक्षित तर होती, परंतु त्याचा आशय

हरवून गेला होता, त्यास स्वामी श्री अडगडानंदजी महाराजांनी 'यथार्थ गीता' भाष्य रुपा-मध्ये पुन्हा प्रकाशित केले आहे व त्याची विश्व धर्म संसद,विद्वत् परिषद, ब्राह्मण महासभा इत्यादि विश्वातील संस्थांनी प्रंशसा केली आहे. आपणा सर्वांकडून अपेक्षा आहे की आपण 'यथार्थ गीता'-धर्मशास्त्राचे नियमित अध्ययन करून ह्या लोकी समृद्धि प्राप्त कराल आणि परमश्रेयाच्या 'नियत' साधनेमध्ये अग्रेसर व्हाल.

'गीते'तील प्रमुख सिद्धांत खालील प्रमाणे आहेत, त्यांच्या यथावत् सोप्या स्पष्टीकरणासाठी वाचा 'यथार्थ गीता' जी सर्व भारतीय भाषांमध्ये, जगातील प्रमुख भाषांमध्ये, ऑडीयो-विडीयो कॅसेटस्, सी.डी. आणि इंटरनेटवरही ( www.yatharthgeeta.com) उपलब्ध आहे. –

**१. आपण सर्व परमश्वराची लेकरे आहोत–**

**ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः।**
**मनः षष्ठानीन्द्रियाणि प्रकृतिस्थानि कर्षति।।** (गीता, १५/७)

सर्व मानव परमेश्वराची लेकरे आहेत, अंश आहेत (एकाच परमेश्वराची मुले आहेत).

**२. मानवी शरीराची सार्थकता–**

**अनित्यमसुखं लोकमिमं प्राप्य भजस्व माम्।।** (गीता, ९/३३)

क्षणभंगुर, दुर्लभ असे मानव शरीर प्राप्त करून तू माझी भक्ति कर. तेव्हा, भजनाचा अधिकार सर्व मानव शरीर धारण करणाऱ्यांस आहे.

**३. मनुष्याच्या केवळ दोन जाति आहेत–**

**द्वौ भूतसर्गौ लोकेऽस्मिन्दैव आसुर एव च।**
**दैवो विस्तरशः प्रोक्त आसुरं पार्थ मे शृणु।।** (गीता, १६/६)

हे अर्जुना! मनुष्यांचे केवळ दोन प्रकार असतात. 'देवता' आणि 'असुर' ज्याच्या हृदयामध्ये दैवी संपद् कार्य करते तो 'देवता'असतो आणि ज्याच्यामध्ये आसुरी संपद् कार्य करते तो 'असुर' असतो. तिसरी कोणतीही जात ह्या सृष्टीमध्ये नाही.

**४. कोणतीही कामना ईश्वर पूर्ण करतो–**

**त्रैविद्या मां सोमपाः पूतपापा**
**यज्ञैरिष्ट्वा स्वर्गतिं प्रार्थयन्ते।**
**ते पुण्यमासाद्य सुरेन्द्रलोक-**
**मश्नन्ति दिव्यान्दिवि देवभोगान्।।** (गीता, ९/२०)

मला (एक इष्ट, परमात्मा, सद्गुरु ) भजून लोक स्वर्गाचीही कामना करतात. मी त्यांना तो देतो. अर्थात एका परमात्म्याच्या भक्तीने सर्वकाही प्राप्त होते.

**५. परमेश्वराला शरण गेल्यास पापांचा नाश होतो–**

**अपि चेदसि पापेभ्यः सर्वेभ्यः पापकृत्तमः।**
**सर्वं ज्ञानप्लवेनैव वृजिनं सन्तरिष्यसि।।** (गीता, ४/३६)

अर्जुना! तू संपूर्ण पाप्यांपेक्षाही अधिक पाप करणारा असलास तरीही ज्ञानरूपी नौकेद्वारा तू निःसंदेह तरून जाशील.

६. **ज्ञान–**

**अध्यात्मज्ञाननित्यत्वं तत्त्वज्ञानार्थ दर्शनम्।**
**एतज्ज्ञानमिति प्रोक्तमज्ञानं यदतोऽन्यथा।।** (गीता, १३/११)

अध्यात्मज्ञान- आत्म्याच्या आधिपत्याखाली ईश्वरा-संबंधी ज्ञानामध्ये (आत्मज्ञानामध्ये) एकरस अशी स्थिति आणि तत्त्वार्थरूपी माझे, परमात्म्याचे प्रत्यक्ष दर्शन हेच 'ज्ञान' होय, आणि ह्याच्या व्यतिरिक्त जे काही आहे ते 'अज्ञान' आहे. आत्मज्ञान, तत्त्वज्ञान मिळताच मनुष्य आत्मस्थित, तत्त्वस्थित होतो, परमात्मस्वरूपामध्ये स्थित होतो.

७. **साधनेचा अधिकार सर्वांना आहे–**

**अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक्।**
**साधुरेव स मन्तव्यः सम्यग्व्यवसितो हि सः।।** (गीता, ९/३०)

**क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वच्छान्तिं निगच्छति।**
**कौन्तेय प्रतिजानीहि न मे भक्तः प्रणश्यति।।** (गीता, ९/३१)

अत्यंत दुराचारी सुध्दा माझी साधना करून लवकरच धर्मात्मा बनू शकतो व सतत राहणारी शाश्वत शांति प्राप्त करू शकतो. तेव्हा धर्मात्मा (धार्मिक) तो आहे, जो एका परमात्म्याच्या प्रति समर्पित आहे. गीता सदाचारी - दुराचारी ह्या मध्ये भेद करीत नाही, सर्वांचे एकसमान कल्याण करते.

८. **भगवत्पथामध्ये बीजाचा नाश होत नाही–**

**नेहाभिक्रमनाशोऽस्ति प्रत्यवायो न विद्यते।**
**स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्।।** (गीता, २/४०)

ह्या आत्मदर्शनाच्या ( आत्मा वा परमात्म्याच्या दर्शनाच्या ) क्रियेचे स्वल्प (थोडेसे) आचरणसुध्दा जन्म-मरणाच्या महान भयापासून उध्दार करणारे असते.

९. **ईश्वराचा निवास–**

**सर्वस्य चाहं हृदि सन्निविष्टो...।** (गीता, १५/१५)

मी सर्व प्राण्यांच्या हृदयामध्ये अन्तर्यामी स्वरूपात स्थित आहे.

**ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति।**

**भ्रामयन्सर्वभूतानि यन्त्रारूढानि मायया।।** (गीता, १८/६१)

ईश्वर सर्व भूत-प्राण्यांच्या हृदयामध्ये राहतो.

**तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत।**
**तत्प्रसादात्परां शान्तिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम्।।** (गीता, १८/६२)

अर्जुना!तू संपूर्ण भक्तिभावाने त्या हृदयस्थ (हृदयामध्ये स्थित असलेल्या) एका ईश्वराला, परमात्म्याला शरण जा, त्याच्या कृपेने तू परमशांति आणि शाश्वत परमधाम प्राप्त करशील.

**१०. यज्ञ–**

साधनेच्या विधि-विशेषाचे नाव यज्ञ होय.

**सर्वाणीन्द्रियकर्माणि प्राणकर्माणि चापरे।**

**आत्मसंयमयोगाग्नौ जुह्वति ज्ञानदीपिते।।** (गीता, ४/२७)

यज्ञामध्ये साधक,मनासहित संपूर्ण इंद्रियांच्या चंचलतेला तसेच प्राणांच्या व्यापाराला आत्मसाक्षात्काराव्दारे ज्ञाना ने प्रकाशित झालेल्या आत्म्यामध्ये, संयमरूपी योगाग्निमध्ये हवन करतात.

अर्थात् इंद्रियांना विषयांपासून दूर करून, निग्रह करून, संयमरूपी अग्नीमध्ये भस्म वा दग्ध करणे हा यज्ञ होय.

भौतिक द्रव्यांनी सिद्ध होणारे यज्ञ हे अत्यल्प असतात.

**अपाने जुह्वति प्राणं प्राणेऽपानं तथापरे।**

**प्राणापानगतीरुद्ध्वा प्राणायामपरायणाः।।** (गीता, ४/२९)

काही योगी श्वासाचे प्रश्वासामध्ये हवन करतात आणि काही प्रश्वासाचे श्वासामध्ये. ह्यापेक्षा उन्नत अवस्था येताच काही योगीजन श्वास-प्रश्वासाच्या गतीला रोखून प्राणायामात आसक्त होतात. अशाप्राकारे योग-साधनेच्या विधि-विशेषाचे नाव यज्ञ आहे. त्या यज्ञास कार्यरूप देणे हेच कर्म होय.

**११. यज्ञाचा परिणाम तसेच यज्ञ करण्याचा अधिकार–**

**यज्ञशिष्टामृतभुजो यान्ति ब्रह्म सनातनम्।**
**नायं लोकोऽस्त्ययज्ञस्य कुतोऽन्यः कुरुसत्तम।।** (गीता, ४/३१)

अर्जुना! यज्ञ ज्याची वर्षा करतो, जे शेष रहाते ते आहे- अमृत,त्यास प्रत्यक्ष जाणणे हेच ज्ञान होय. त्या ज्ञानामृताचे सेवन करणारा योगी शाश्वत, सनातन ब्रह्माप्रत पावतो.

श्रीकृष्ण म्हणतात की यज्ञरहित पुरुषास मानवी शरीरही सहज मिळत नाही तर परलोक कोठून मिळणार? म्हणजेच यज्ञ करण्याचा अधिकार त्या सर्वांना आहे ज्यांना मनुष्य शरीर मिळालेले आहे.

**१२. ईश्वराला पहाणे शक्य आहे–**

**भक्त्या त्वनन्यया शक्य अहमेवंविधोऽर्जुन।**
**ज्ञातुं द्रष्टुं च तत्त्वेन प्रवेष्टुं च परन्तप।।** (गीता, ११/५४)

अनन्य (अन्य न) भक्तिव्दारे मला प्रत्यक्ष पहाणे, जाणणे तसेच माझ्याठायी प्रवेश करणे सहज सुलभ आहे.

**आश्चर्यवत्पश्यति कश्चिदेन-**
**माश्चर्यवद्वदति तथैव चान्यः।**
**आश्चर्यवच्चैनमन्यः शृणोति**
**श्रुत्वाप्येनं वेद न चैव कश्चित्।।** (गीता, २/२९)

ह्या अविनाशी आत्म्यास कोणी विरळाच (अनन्य भक्तच) आश्चर्य म्हणून पहातो. दूसरा कोणी विरळा साधकच त्यास आश्चर्यकारक म्हणून त्याच्याविषयी ऐकतो, सर्वांनाच असे ऐकता येत नाही, आणि हेच प्रत्यक्ष दर्शन होय.

**१३. आत्माच सत्य आहे, शाश्वत आहे, सनातन आहे–**

**अच्छेद्योऽयमदाह्योऽयमक्लेद्योऽशोष्य एव च।**
**नित्यः सर्वगतः स्थाणुरचलोऽयं सनातनः।।** (गीता, २/२४)

ह्या आत्म्याला छेदणे शक्य नाही, जाळणे शक्य नाही, पाणी त्यास ओले करू शकत नाही, आकाश त्याला आपल्यात सामावून घेऊ शकत नाही. हा आत्मा सर्वव्यापक, अचल, स्थिर रहाणारा आणि सनातन आहे.आत्मा सत्य आहे, शाश्वत आहे, सनातन आहे.

**१४. विधाता आणि त्याच्यापासून उत्पन्न झालेली सृष्टि नश्वर आहे–**

**आब्रह्मभुवनाल्लोकाः पुनरावर्तिनोऽर्जुन।**
**मामुपेत्य तु कौन्तेय पुनर्जन्म न विद्यते।।** (गीता, ८/१६)

ब्रह्मापासून कीटक-पतंगादि सर्व लोक पुनर्जन्म पावणारे आहेत,जन्म घेणे व मरणे या फेऱ्यात सतत फिरणारे आहेत,परंतु कौन्तेय!मजप्रत आल्यानंतर त्या पुरुषाचा पुनर्जन्म होत नाही. तेव्हा ब्रह्मा आणि त्यापासून निर्मित सृष्टि, देवता आणि दानव, दुःखांची खाण, क्षणभंगुर आणि नश्वर आहेत.

**१५. अविवेकीच देवपूजा करतात. हे पूजन अविधिपूर्वक आहे, त्यामुळे नष्ट होते–**

**कामैस्तैस्तैर्हृतज्ञानाः प्रपद्यन्तेऽन्यदेवताः।**
**तं तं नियममास्थाय प्रकृत्या नियताः स्वया।।** (गीता, ७/२०)

कामनांनी ज्यांची बुद्धि व्यापलेली आहे (कामनांनी भरलेली आहे), असे अविवेकी (मूढबुद्धीचे) लोकच परमात्म्या व्यतिरिक्त अन्य देवतांची पूजा करतात.

**येऽप्यन्यदेवता भक्ता यजन्ते श्रद्धयान्विताः।**
**तेऽपि मामेव कौन्तेय यजन्त्यविधिपूर्वकम्।।** (गीता, ९/२३)

देवतांना पूजणारा माझीच पूजा करतो; परंतु ते पूजन अविधिपूर्वक असते, माझ्या प्राप्तीसाठी लागणारा विधि त्यास्थानी नसतो, म्हणून नष्ट होऊन जाते.

**शास्त्रविधीचा त्याग–**

अर्जुना! शास्त्रविधीचा त्याग करून पूजणारे - सात्विक पुरुष देवतांचे पूजन करतात, राजसी पुरुष यक्ष-राक्षसांचे पूजन करतात आणि तामसी पुरुष भूत-प्रेताची पूजा करतात. (गीता, १७/४-५)

**कर्शयन्तः शरीरस्थं भूतग्राममचेतसः।**
**मां चैवान्तः शरीरस्थं तान्विद्ध्यासुरनिश्चयान्।।** (गीता, १७/६)

परंतु ते शरीरामध्ये स्थित असलेल्या भूतसमुदायास आणि अंतःकरणात स्थित असलेल्या मला परमात्म्याला कृश (क्षीण) करतात; त्यांना तू असुर समज!म्हणजेच देवतांना पूजणारेही आसुरी वृत्तीच्या अंतर्गत येतात.

**१६. अधम कोण आहे?–**

**तानहं द्विषतः क्रूरान्संसारेषु नराधमान्।**
**क्षिपाम्यजस्रमशुभानासुरीष्वेव योनिषु।।** (गीता, १६/१९)

जे यज्ञाचा निर्धारित विधि सोडून स्वतःच्या मनाप्रमाणे यजन करतात,'ते'च क्रूरकर्मी, पापाचे आचरण करणारे व मनुष्यांमध्ये अधम आहेत. अन्य कोणी अधम नाही.

**१७. निर्धारित विधि कोणता?–**

**ओमित्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन्मामनुस्मरन्।**
**यः प्रयाति त्यजन्देहं स याति परमां गतिम्।।** (गीता, ८/१३)

ॐ, जो अक्षय ब्रह्माचा द्योतक आहे, त्याचा जप तसेच माझे, एका परमात्म्याचे स्मरण, तत्त्वदर्शी महापुरुषांच्या मार्गदर्शनाखाली ध्यान, हाच नियत (निर्धारित) विधि आहे.

**१८. शास्त्र 'गीता' आहे–**

**इति गुह्यतमं शास्त्रमिदमुक्तं मयानघ।**
**एतद्बुद्ध्वा बुद्धिमान्स्यात्कृतकृत्यश्च भारत।।** (गीता, १५/२०)

अशाप्रकारे अति गोपनीय शास्त्र माझ्या द्वारा सांगितले गेले. त्यास तत्वतः जाणून मनुष्य पूर्णज्ञ आणि कृतार्थ होतो. तेव्हा स्पष्ट आहे की 'गीता' हेच शास्त्र आहे.

**तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ।**
**ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि।।** (गीता, १६/२४)

अर्जुना! तुझ्या कर्तव्य- अकर्तव्याबद्दलच्या निर्णयामध्ये शास्त्रच प्रमाण आहे.तेव्हा गीता-शास्त्रा द्वारा निर्धारित केलेल्या विधिप्रमाणे आचरण करावे.

**१९. धर्म–**

**सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज।।** (गीता, १८/६६)

धार्मिक उलथा-पालथीमध्ये न पडता एकमात्र मला शरण ये. अर्थात एका परमेश्वराप्रति पूर्ण समर्पण हेच धर्माचे मूळ आहे.

त्या परमेश्वराला प्राप्त करण्याच्या निर्धारित विधीचे (गीतोक्त विधीचे) आचरण हेच धर्माचरण आहे. (गीता, २/४०)

आणि जो ते करतो, तो अत्यंत पापी असला तरी लवकरच धर्मात्मा बनतो. (अध्याय ९, श्लोक ३०-३१)

**२०. धर्म कोठून प्राप्त करावा?–**

**ब्रह्मणो हि प्रतिष्ठाहममृतस्याव्ययस्य च।**
**शाश्वतस्य च धर्मस्य सुखस्यैकान्तिकस्य च।।** (गीता, १४/२७)

त्या अविनाशी ब्रह्माचे, अमृताचे, शाश्वत धर्माचे आणि त्या अखंड एकरस आंनदाचे मीच आश्रयस्थान आहे अर्थात् परमात्मस्थित सद्गुरुच ह्या सर्वांचे आश्रयस्थान आहे. सद्गुरुंना शरण गेल्यानेच ह्यांची प्राप्ति संभव आहे.

**२१. जेथे गीता आहे तेथे दुष्ट आत्म्यांचा प्रभाव पडत नाही–**

**स्थाने हृषीकेश तव प्रकीर्त्या**
**जगत्प्रहृष्यत्यनुरज्यते च।**
**रक्षांसि भीतानि दिशो द्रवन्ति**
**सर्वे नमस्यन्ति च सिद्धसङ्घाः।।** (गीता, ११/३६)

परमेश्वराच्या महिम्यापुढे राक्षस भयभीत होऊन पळून जातात.

**२२. 'यथार्थ गीते' चे नियमित श्रवण, वाचन व अध्ययनाने परमेश्वर प्रसन्न होतो आणि प्रत्येक कामना पूर्ण होते–**

श्रद्धाळू, भाविक व जिज्ञासू मनुष्यास गीता ऐकवणारा पुरुष ईश्वराचा अत्यंत लाडका बनतो.

**य इमं परमं गुह्यं मद्भक्तेष्वभिधास्यति।**
**भक्तिं मयि परां कृत्वा मामेवैष्यत्यसंशयः।।** (गीता, १८/६८)

जो मनुष्य माझ्यावर नितांत प्रेम करून हा परम रहस्ययुक्त गीतेतील उपदेश माझ्या भक्तांना सांगेल, तो उपदेश देणारा भक्त निःसंदेह मलाच येऊन मिळेल-ह्यात काही शंका नाही.

**न च तस्मान्मनुष्येषु कश्चिन्मे प्रियकृत्तमः।**
**भविता न च मे तस्मादन्यः प्रियतरो भुवि।।** (गीता, १८/६९)

सर्व मनुष्यांमध्ये त्याच्यापेक्षा (उपदेश करणाऱ्या पेक्षा)वरचढ मला प्रिय असलेले कार्य करणारा ना कोणी आहे, आणि ना या जगात त्याच्यापेक्षा अधिक प्रिय मला दुसरा कोणी होईल.

**अध्येष्यते च य इमं धर्म्यं संवादमावयोः।**
**ज्ञानयज्ञेन तेनाहमिष्टः स्यामिति मे मतिः।।** (गीता, १८/७०)

जो पुरुष आमच्या दोघांच्या ह्या धर्ममय संवाद असलेल्या 'गीते' चे अध्ययन करेल त्याच्याद्वारे 'ज्ञानयज्ञा' ने मीच पूजला जाईन.

**श्रद्धावाननसूयश्च शृणुयादपि यो नरः।**
**सोऽपि मुक्तः शुभाँल्लोकान्प्राप्नुयात्पुण्यकर्मणाम्।।** (गीता, १८/७१)

जो पुरुष गीतेनुसार'नियतकर्म' करण्यास असमर्थ आहे, परंतु जो श्रध्देने गीताज्ञान ऐकतो, श्रवण करतो, त्यालाही पुण्यलोक प्राप्त होतो.

**नोट** : विश्वातील सर्व संप्रदाय-पंथांचा सत्याचा स्त्रोत, 'गीते'चेच प्रसारण आहे.

**आवश्यक** : प्रत्येक विद्यार्थ्याने दरदिवशी सकाळी वा संध्याकाळी यथार्थ गीतेच्या चार श्लोकांचे अर्थासहित, लयपूर्वक पठण अवश्य केले पाहिजे.

* * *

## — पूज्य स्वामींचा उपदेश —

आपल्या संस्कृतिप्रमाणे आपण सर्व कार्यांचा प्रारंभ व समापन परमेश्वराच्या स्मरणाने करतो. म्हणून प्रिय मुलांनो! झोपता-उठता, शौचाला जाता, आंघोळ करता, जेवताना, पाणी पिताना, उठता-बसता, शाळेत जाताना, वाचता-लिहीता, खेळताना, जीवनातील प्रत्येक घडामोडीत एका परमेश्वराचे स्मरण राहू दिलेत तर 'सोन्याहून पिवळे 'होईल. हां! सकाळ संध्याकाळ १५ ते २० मिनिटे बसून ॐ चा जप करण्यास वेळ अवश्य द्यावा. सर्व मुले, तरुण, म्हातारे, स्त्री-पुरुष ज्यांना ज्यांना मानव शरीर प्राप्त झाले आहे त्या सर्वांनी ॐ चा जप केला पाहिजे......

**—स्वामी श्री अड़गड़ानन्दजी महाराज**

# महापुरुष, भगवान् , इष्ट, सद्गुरु, योगेश्वराची (श्रीकृष्णाची) प्रार्थना

## एका अनुरागी शिष्याद्वारे (अर्जुनाद्वारे)

त्वमक्षरं परमं वेदितव्यं
त्वमस्य विश्वस्य परं निधानम्।
त्वमव्ययः शाश्वतधर्मगोप्ता
सनातनस्त्वं पुरुषो मतो मे ॥११/१८॥
त्वमादिदेवः पुरुषः पुराण-
स्त्वमस्य विश्वस्य परं निधानम्।
वेत्तासि वेद्यं च परं च धाम
त्वया ततं विश्वमनन्तरूप ॥११/३८॥
वायुर्यमोऽग्निर्वरुणः शशाङ्कः
प्रजापतिस्त्वं प्रपितामहश्च।
नमो नमस्तेऽस्तु सहस्रकृत्वः
पुनश्च भूयोऽपि नमो नमस्ते ॥११/३९॥
पितासि लोकस्य चराचरस्य
त्वमस्य पूज्यश्च गुरुर्गरीयान्।
न त्वत्समोऽस्त्यभ्यधिकः कुतोऽन्यो
लोकत्रयेऽप्यप्रतिमप्रभाव ॥११/४३॥

**सूचना**-सर्व श्लोकांच्या भावार्थासाठी वाचावी 'यथार्थ गीता.'

* * *

# विद्यार्थ्यांचे कर्तव्य

**प्रिय विद्यार्थ्यांनो,**

खालील नियमांचे पालन करून तुम्ही तुमच्या जीवनातील सर्व ध्येयांना प्राप्त करू शकाल. पालन करून तर बघा!

## नियत दिनचर्या

- दररोज ब्रह्ममुहूर्तावर पहाटे चार वाजता अवश्य उठले पाहिजे.

❒ उठून कोणा 'एका' इष्ट, परमात्मा वा सद्गुरुचे (सर्व एकच आहेत, पर्यायवाची संबोधने आहेत) श्रद्धापूर्वक ध्यान केले पाहिजे. (१० मिनिटे).

❒ इष्ट ध्यानानंतर १५ मिनिटे तोंडाने उच्चार करून ओम् चा जप करावा. श्वास आत घेतला की ओम्, बाहेर पडला (उच्छवास) की ओम्. अशाप्रकारे श्वास-प्रश्वासाच्या स्वाभाविक गतीबरोबर ओम् चा लयपूर्वक धारावाही जप करावा. जप करताना श्वास-प्रश्वासाबरोबर ओम् च्या चढाव-उतारावर लक्ष्य ठेवावे.

❒ ध्यान हृदयामध्येच केले जाते कारण तेथेच परमात्मा निवास करतो.

- मुलांनो! ॐ चा च जप का करावा?–

गीतेमध्ये भगवान श्रीकृष्ण म्हणतात–

**ओमित्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन्मामनुस्मरन्।**
**यः प्रयाति त्यजन्देहं स याति परमां गतिम्।।** (गीता, ८/१३)



जी पुरुष 'ओम् इति'-मात्र ओम्,जी परब्रह्म, परमात्म्याचा द्योतक आहे त्याचा जप व माझे स्मरण (अर्थात परमात्मस्वरूप सद्गुरुच्या स्वरूपाचे ध्यान) करीत शरीराचा त्याग करतो (अर्थात शरीरासंबंधीच्या गोष्टींचा त्याग करून परमात्म्यामध्ये स्थिति प्राप्त करतो),त्याला परमगती प्राप्त होते. जिवंतपणीच त्याची प्राप्ति होते.पूर्ण 'गीते'मध्ये परमात्मा श्रीकृष्णाने सात वेळा 'ओम्' चा उल्लेख केला आहे आणि केवळ 'ओम्' इतकाच जप करण्याचा आदेश दिला आहे.का नाही आपण त्यांची आज्ञा जशीच्या तशी मानूया?कारण आपण सर्व त्याच परमात्म्याचे सनातन अंश

आहोत,संतान आहोत.– **ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः।** (गीता, १५/७) तेव्हा ‘ॐ’ चा जप करावा आणि इष्ट ‘सद्गुरुं’ चे ध्यान करावे.

वास्तविक त्या परमात्म्याची, प्रभूची अनंत नावे आहेत. त्यांचे कीर्तन आणि गुणगान करते वेळी त्यांच्या विभूति, अंश आणि लिलांसहित त्यांची सहस्त्र नावे घेऊ शकता परंतु चिंतन/जप केवळ ‘ॐ’ चा च करावा.

- रोज सकाळी मोठ्यांना, आई-वडिल तसेच गुरुजनांना सादर प्रणाम करावा. घरातील मोठ्यांची-म्हाताऱ्या माणसांची सेवा केली पाहिजे आणि सर्वांच्या आज्ञेचे पालन केले पाहिजे. त्याने तुमचे आयुष्य, विद्या, यश आणि शक्ति ह्यांमध्ये वृद्धि होईल.
- रोज सकाळी अथवा संध्याकाळी ‘यथार्थ गीते’तील चार श्लोकांचे अर्थासहित, लक्षपूर्वक वाचन करावे.
- **प्रति सप्ताह–**

❒ गीतेतील एक श्लोक पाठ करावा.

❒ एक ‘यथार्थ गीता’अभ्यास वही बनवून त्यात दर आठवड्याला तीन श्लोक लिहावेत.

❒ हे साप्ताहिक कार्य आपल्या आई-वडिलांना तसेच शाळेतील गुरुजनांना दाखवावे व पाठ केलेले श्लोक त्यांना म्हणून दाखवावेत.

❒ शाळेत, घरी अथवा शेजारी-पाजारी- आपल्या मित्रांबरोबर एका तासाच्या ‘यथार्थ गीता’ज्ञान सभेचे दर आठवड्याला आयोजन करावे. ह्या सभेमध्ये यथार्थ गीतेचे सामुदायिक वाचन करावे आणि त्यावर आपसात चर्चा करून आपले ज्ञानभांडार वाढवावे. ह्या कार्यक्रमात आपल्या गुरुजनांना आणि आपल्या पालकांना आमंत्रित करून त्यांच्याकडून मार्गदर्शन व त्यांचे आशीर्वाद प्राप्त करावेत.

- नियमित शाळेला जावे. अभ्यासाकडे पूर्ण लक्ष्य द्यावे आणि शाळेत दिलेला गृहपाठ रोजच्या रोज पूर्ण करावा.
- उत्तम स्वास्थ्य आणि शरीरसौष्ठवासाठी शारीरिक परिश्रम, खेळ वा व्यायाम रोज करावा.
- रात्री नऊ वाजता अवश्य झोपावे की ज्यामुळे पहाटे चार वाजता ब्रह्ममुहूर्तावर उठणे शक्य होईल. झोपण्या-उठण्याच्या वेळेचे नियमित पालन करावे. त्याने आपले सारे काम व्यवस्थित होईल.
- **आवश्यक–** रात्री झोपण्याच्या आधी इष्ट देवतेचे ध्यान करावे आणि वर सांगितलेल्या पद्धतीने १० मिनिटे ओम् चा जप करीत-करीत झोपून जावे.

* * *

# यश, समृद्धि आणि साधनेचे नियम

**प्रिय विद्यार्थ्यांनो!**

'गीता' एक अद्‌भुत ग्रंथ आहे. मानवी जीवनाचा असा एकही पैलू नाही ज्याचा गीतेमध्ये उल्लेख झालेला नाही. ही संसारिक विवंचना सुलभ करून मोक्षसुद्धा प्रदान करते. नुकतेच तुम्हाला हे कळले आहे की आर्यावर्त भारताच्या सर्व स्मृतिज्ञानाला संकलित आणि लिपीबद्ध करून महर्षि वेदव्यासांनी स्वत: हा निर्णय दिला आहे की–

**'गीता सुगीता कर्तव्या किमन्यैः शास्त्रविस्तरैः।'**

कर्तव्य-अकर्तव्या बद्दलच्या निर्णयात (अर्थात काय केले पाहिजे आणि काय करता कामा नये) गीताशास्त्र असताना अन्य शास्त्रांच्या विस्तारात जाण्याची काय गरज? तेव्हा शुभ संस्कारांचे सृजन व्हावे व यश प्राप्त व्हावे ह्यांसाठी ज्या सद्‌गुणांचा आधार हवा ते सद्‌गुण गीतेमध्ये संपूर्णपणे वर्णिलेले आहेत,त्याचे अनुकरण करा.

गीता वक्ता श्रीकृष्ण सांगतात की ह्या जगामध्ये मनुष्याचे स्वभाव दोन प्रकारचे असतात-देवतांसारखा आणि असुरांसारखा. जेव्हा दैवी संपत्तीचे (दैवी गुणांचे) बाहुल्य असते तेव्हा तो मनुष्य देवतांसारखा असतो आणि जेव्हा आसुरी संपत्तीचे (आसुरी गुंणाचे) बाहुल्य असते तेव्हा तोच मनुष्य असुरांसारखा असतो. सृष्टीमध्ये मनुष्याच्या दोनच जाति आहेत. तिसरी जात नाही.

प्रिय विद्यार्थ्यांनो! तुम्हाला तुमच्या आसुरी गुणांना समूळ नष्ट करून निरंतर दैवी गुणांना संपादन करण्याचा (वृद्धि करण्याचा) प्रयत्न केला पाहिजे.

## * दैवी सम्पत्ति *

यथार्थ गीतेच्या सोळाव्या अध्यायातील पहिल्या तीन श्लोकात सर्व दैवी संपत्तीचे (गुणांचे) वर्णन श्रीकृष्णांनी केले आहे. हे सर्व गुण अंशात्मक रुपात आमच्यात, तुमच्यात, सर्वांच्यात आहेत. यथार्थ गीता वाचा आणि दैवी संपत्तीमध्ये वाढ करा.

## * आसुरी सम्पत्तीचे शमन करावे *

आसुरी संपत्तीचे (गुणांचे) शमन करावे-यथार्थ गीतेच्या सोळाव्या अध्यायातील चौथ्या श्लोकात आसुरी गुणांचे वर्णन आहे. **आसुरी गुण आहेत**-दांभिकपणा, घमेंड, अभिमान, क्रोध, कठोरवाणी आणि अज्ञान. हे सर्व आसुरी गुणही आमच्यात, तुमच्यात-सर्वांच्यात आहेत, त्यांना न्यून तसेच आधारहीन करून दैवी संपत्ति वाढीस लावण्यात सतत प्रयत्नशील राहिले पाहिजे.

## * चारित्र्याचे बळ*

चारित्र्य ही मानवाची सर्वश्रेष्ठ संपत्ति आहे. मृत्युनंतरही मनुष्य आपल्या चारित्र्यामुळे लक्षात रहातो. मुलांनो! चारित्र्यवान् व्यक्तीच समाजाचा, राष्ट्राचा आणि विश्वाचा नेता होऊ शकतो. तेव्हा जीवनात सर्वांगीण यशासाठी तुम्हाला तुमचे चारित्र्य उत्तम केले पाहिजे. आपल्या अलौकिक चारित्र्यामुळेच भगवान श्रीराम, श्रीकृष्ण, मूसा, ईसा, मुहम्मद साहेब, महात्मा बुद्ध, स्वामी विवेकानंद, स्वामी परमानंदजी इत्यादि आजही पूजनीय आहेत.

गीतावक्ता भगवान श्रीकृष्णांनी उत्तम चारित्र्यासाठी लागणाऱ्या ज्या दैवी गुणांचा उपदेश, अनुरागी शिष्य अर्जुनाच्या माध्यमातून मानवमात्रासाठी केला आहे, तो वर नमूद केलेला आहे.तो तुमच्यासाठीही आहे, त्यास संपादन केल्यानेच उत्तम चारित्र्य निर्माण होते.

- चारित्र्य निर्माण करण्यासाठी पहिली अट आहे की आपल्यातल्या दोषांना शोधून त्यांना दूर करायचे आणि त्याबद्दल सतत जागरूक रहायचे.
- मनुष्य सदैव निर्दोष असतो, त्याचे अवगुणच त्याला दोषी बनवतात. जर आपण स्वतःला दोषांपासून मुक्त केले (निर्मळ झालो) तर आपण सर्वांना प्रिय होऊ आणि भगवंतालाही प्रिय होऊ.

## * विचारांची शक्ति *

- केवळ विचारांची शक्तीच मनुष्याला अन्य जीवांपासून भिन्न व वैशिष्टयपूर्ण बनवते.
- मनुष्याने विचारशक्तीच्या द्वारेच अध्यात्म,दर्शन,धर्म,विज्ञान,इतिहास,भूगोल, गणित,चिकित्सा,साहित्य,कला,संगीत इत्यादि तमाम विषयांचा विकास केला आहे.
- विचारांमध्ये खूप शक्ति असते,आपण जसा विचार करतो तसेच बनतो. उत्तम विचार केल्याने आपली प्रगती होते तर वाईट विचारांनी आपले पतन होते.
- प्रिय मुलांनो! म्हणून विचारांच्या बाबतीत प्रत्येक क्षणी सावधान रहा व त्यासाठी सद्ग्रंथ 'गीते'चे वाचन करावे आणि सत्पूरुषांच्या सान्निध्यात रहावे. सत्संगाच्या कैसेट अथवा सीडी ऐकाव्या. लक्षात ठेवा! आपण जसे साहित्य वाचतो तसेच विचार आपल्या मनात येतात आणि त्या विचारांनीच आपला सर्व व्यवहार व कार्य प्रभावित होते. तेव्हा प्रेरणादायक, चांगले साहित्यच वाचावे.

## * मनाची शक्ति *

- विचारांचे मूळ केंद्र मन असते. विचार प्रथम मनामध्ये येतो आणि नंतर शरीर त्याप्रमाणे कार्य करते.

- स्वतःच्या मनाचे स्वामी बना, गुलाम नको.
- मनाच्या निर्मलतेसाठी आणि मनोबळ वाढवण्यासाठी नियमितपणे एका परमात्म्याची प्रार्थना आणि ओम् चा जप करावा.

## * वेळेचे महत्व *

- आयुष्य मर्यादित असते परंतु जेवढे असते, जे काही असते, ते अमूल्य असते.
- वेळेचा सदुपयोग करून आपण मोठयात मोठी उपलब्धि प्राप्त करू शकतो, मग ती भौतिक उपलब्धि असो वा आध्यात्मिक उपलब्धि!
- आयुष्यातील प्रत्येक क्षणाचा सदुपयोग केला पाहिजे. प्रत्येक दिवसाचे वेळापत्रक बनवून आणि त्याचे पालन करून आपण आपली सर्व कामे व्यवस्थितपणे पूर्ण करू शकतो.
- वेळेचे सर्वात मोठे शत्रू आहेत - आळस, निद्रा, प्रमाद आणि टाळाटाळ करणे. ह्या सवयी समूळ नष्ट करा.

  **'आलस निद्रा जमुहाई, तीनों काल के भाई।'** – श्री परमानन्द जी महाराज
- वेळ ना कोणाची प्रतीक्षा करतो आणि गेलेला वेळ ना कधी परत येतो. 'बीती ताहि बिसार दे, आगे की सुधि लेय।' तेव्हा आजपासून, नव्हे आतापासूनच वेळेचा सदुपयोग करणे प्रारंभ करा.

## * दुर्व्यसनांपासून दूर रहा *

- कोणत्याही प्रकारची वाईट सवय लावून घेऊ नये.
- पान, विडी, सिगारेट, गांजा, दारू, तंबाखू, गुटखा आणि पान मसाला इत्यादि मादक पदार्थांचे सेवन कधीही करू नका. जर ह्या गोष्टींची सवय असेल तर दृढ-निश्चय करून त्यांचा परित्याग करावा. त्यामुळे बऱ्याच शारीरिक व मानसिक रोगांपासून तुम्ही सुरक्षित रहाल.
- जर तुमच्या मित्राला अथवा वर्गातल्या एखाद्या मुलाला असे व्यसन असेल तर प्रयत्नपूर्वक त्याचे व्यसन सोडवावे किंवा अशा लोकांची संगत सोडावी.
- चांगल्या,विचारी,सुसंस्कारीत लोकांचीच संगत धरावी आणि मैत्री करावी.वाईट लोकांची संगत सोडून द्यावी. मनुष्याच्या जीवनात संगतीचा खूप प्रभाव पडतो. एक जुनी म्हण आहे-'माणूस कसा आहे ते त्याच्या संगतीवरून कळते' तेव्हा सुसंगतीत रहा,कुसंगत सोडून द्या.सत्संगतीने शुभ संस्कारांचा उदय होतो.

* * *

# ब्रह्मचर्यांचे पालन करावे

- ध्येय,ब्रह्म व 'इष्ट' च्या प्राप्तीच्या हेतूने केलेला, मन तसेच शरीराच्या दहा इंद्रियांचा, संयम म्हणजेच ब्रह्मचर्य होय.त्याचे आचरण करणाराच (पालन करणारा) ब्रह्मचारी असतो.
- ह्या इंद्रियांचा सर्वात मुख्य विषय आहे-कामवासना.मनासहित इंद्रिये त्यामागे आपोआप धावत असतात,मनुष्याला सतत अस्थिर ठेवत असतात. त्यांचे सफल होणे हा साधनेमधील मुख्य शत्रू असतो.
- दृढ इच्छाशक्ति आणि संयमानेच त्यांना वश करता येते.

**खालील गोष्टी नेहमी लक्षात ठेवाव्यात.**

- मन कधी स्थिर नसते, नेहमी कसला-न-कसलातरी विचार करीत असते.मनाचे सतत निरीक्षण करा,अशुभ विचारांना मनातून काढून शुभ विचार करा.
- मनामध्ये कामवासनेचे विचार येताच सतर्क व्हावे, त्या विचारांना ताबडतोब थांबवावे, अन्यथा इंद्रियांच्या सहाय्याने ते विचार तुम्हाला वहावत नेतील. त्यासाठी लगेच जागा बदलावी, दुसऱ्या कामामध्ये व्यस्त व्हावे, सद्ग्रंथ 'गीता' वाचावी, इष्ट चिंतन करावे आणि 'ओम 'चा जप करावा.
- अश्लील दृश्ये, फिल्म आणि टी. वी कार्यक्रम बघू नयेत. अश्लील पुस्तके व पत्रे वाचू नयेत. इंटरनेटवर ना अश्लील चॅटींग करावे ना अश्लील साईट बघाव्यात.
- उन्मादक नृत्य, गाणी, संगीत असलेल्या कार्यक्रमात भाग घेऊ नये.
- सर्व विद्यार्थ्यांनी, पुरुषांनी व स्त्रियांनी शाळा, विद्यालय, सार्वजनिक कार्यक्रम, महापुरुषांचा सत्संग आणि आश्रम इत्यादि ठिकाणी नम्रपणे वागावे आणि साधे कपडे घालून जावे.वैभव प्रदर्शन व अंग-प्रदर्शन तर कदापि करू नये.पालकांनीही हे लक्षात ठेवावे,त्याचे पालन करावे व दुसऱ्यांना करायला लावावे. अशाप्रकारे तुमचे कल्याण होईल व इतरांचेही कल्याण होण्यात तुमचे सहाय्य होईल.
- **स्वतः निग्रही रहा–**

❒ **संतन के चित पैठ के, लखा दीख सब मात।**
**की भगिनी समदर्शी हैं, की पुत्री सम गात।।**

**भावार्थ–** संतांच्या चित्ताचे निरीक्षण केले तर कळते की जेव्हा त्यांची दृष्टि स्त्रीवर

पडते तेव्हा त्यांना तिच्यामध्ये मातेचे दर्शन होते अथवा ती त्यांना भगिनी वा पुत्रीसमान प्रतीत होते.साधनेमध्ये प्रवृत्त झालेली व्यक्ति स्त्रीला ह्याच दृष्टीने बघते.

**–स्वामी अड़गड़ानन्दजी महाराज**

(शंका समाधान, ज्ञानगंगा-३३)

- ❒ **मातृवत् परदारेषु परद्रव्येषु लोष्ठवत्।**– परस्त्रीस मातेसमान आणि परधनास दगड-मातीसमान मानावे.
- ❒ कोणत्याही सुंदर स्त्रीवर नजर पडली तर तिच्यामध्ये मातेला पहावे, मनातल्या मनात तिला नमस्कार करावा म्हणजे तुमच्यामध्ये काम वासना जागृत होणार नाहीत.

**–श्री रामकृष्ण परमहंस**

## ● विद्यार्थीनीचे व स्त्रीयांचे कर्तव्य–

- ❒ कोणत्याही पुरुषाकडे आकर्षित होऊ नये.त्यांना तुमच्या पिता,भाऊ वा पुत्राच्या रुपात बघावे.मनाला सतत नियंत्रणाखाली ठेवावे.परपुरुषाला ना स्पर्श करावा, ना करून द्यावा.
- ❒ मोठयांच्या,श्रेष्ठ पुरुषांच्या व संतांच्या चरणांना स्पर्श करून प्रणाम वा नमस्कार करू नये.लांबून आदराने वाकून नमस्कार करावा.

* * *

# आत्मोन्नतीचे सुवर्ण नियम

- नियमित व संयमित दिनचर्या सुखी जीवनाचा आधार आहे.
- मनाला काबूत ठेवा,कामनांवर नियत्रंण ठेवा आणि ध्येयाबद्दल सतत जागरूक रहा.
- बुद्धि व विवेकाने काम करणारा उन्नतीच्या मार्गावर सदा पुढे असतो.
- संघर्षशील जीवनच खुलून उठते.विपत्तीच संपत्ति बनते.जगातील सर्व महान् पुरुषांनी जीवनातील अडचणी व कष्टांशी नेटाने झगडून सफलता प्राप्त केली आहे.
- समजुतदारपणाने, जबाबदारीने, ईमानदारीने व बहादूरीने जीवन जगा.
- सात्विक भोजन करा. दूध, दही व तूप ह्यांचा आहारात नियमित समावेश करा. ब्रह्मचर्याचे पालन करा.
- कार्यमग्न रहा, आनंदी रहा, स्वस्थ रहा. दुसऱ्यांचा सल्ला घ्या आणि अशापद्धतीने लोकांना मान द्या. सुख वाटा आणि दुःखात सहभागी व्हा.
- मेहनती, अभ्यासू, नम्र, मधुरभाषी, आज्ञाधारक आणि चारित्र्यसंपन्न व्यक्तीच सफलता प्राप्त करती.
- नेहमी आशावादी व प्रसन्न रहा.कर्तुत्ववान बना भाग्यावर विसंबून राहू नका. सतत कर्तुत्वाव्दारे दुर्भाग्यावर मात करून, सौभाग्य निर्माण करा.
- अध्ययनाने गीतोक्त साधनेला स्विकारा.अध्ययन म्हणजे ‘यथार्थ गीता’ तीन-चार वेळा वाचा.साधनेला सुरवात करा.सर्व बाबतीत सफलता मिळेल.

ह्या नियमांचे पालन केल्याने तुमच्यामध्ये चांगल्या संस्कारांचे सृजन होईल. शारीरिक,मानसिक,बौद्धिक,नैतिक आणि सर्वतोपरि आध्यात्मिक शक्तींचा विकास तुमच्यामध्ये होईल.तुमचे जीवन सुखमय व समृद्धमय होईल. तुम्ही तुमच्या समाजाचे,राष्ट्राचे व विश्वाचे महान नागरिक व्हाल.

* * *

**‘यथार्थ गीते’मधून....**

श्रीकृष्णाच्या अनुसार केवळ पुस्तके कर्माची माध्यम नसून महापुरुषच कर्माचे माध्यम आहेत. पुस्तक तर एक अनुमानपत्र असते. ते घोकण्याने कोणी निरोगी होत नाही, परंतु त्यास आमलात आणावे लागते.

!! ॐ श्री सद्गुरूदेवाय नमः !!

# गुरु-महिमा

राम कृष्ण से को बड़ा, तिन्हहु तो गुरु कीन।
तीन लोक के ये धनी, गुरु आज्ञा आधीन।।

भगवान श्रीराम, श्रीकृष्ण ह्यांपेक्षा महान असा कोणी पूजनीय आहे? तेही मानवी शरीरधारी होते. बालपणी त्यांनीही गुरु विश्वामित्र, वशिष्ट आणि सांदिपनी मुनींना शरण जाऊन सर्व लौकिक आणि पारलौकिक विद्या ग्रहण करून मानवापासून महामानवापर्यंत, पुरुषापासून महापुरुषापर्यंतची स्थिति प्राप्त केली होती. तेव्हा मुलांनो! सदगुरुना शरण, त्यांची सेवा आणि त्यांच्या आज्ञेचे पालन सर्व विद्यांची जननी आहे. जी आपल्याला सामर्थ्यवान, विद्यावान आणि महान बनविते.

धन्या माता पिता धन्यो, गोत्रं धन्यं कुलोद्भवः।
धन्या च वसुधा देवि यत्र स्याद्गुरुभक्तता।।

ज्याच्यामध्ये गुरुभक्ति असते त्याची माता धन्य आहे.त्याचे पिता धन्य आहेत,त्याचा वंश धन्य आहे, त्याच्या वंशामध्ये जन्म घेणारे धन्य आहेत, समग्र धरणी माता धन्य आहे.

* * *

## विश्वाची महान संस्कृति असलेली भारतातील गुरु-शिष्य परंपरा



गुरु वशिष्ठांच्या
श्री चरणांपाशी
भगवान श्रीराम

गुरु सांदिपनींच्या
श्री चरणांपाशी
भगवान श्रीकृष्ण





गुरु श्री परमानंदजींच्या
श्री चरणांपाशी
श्री अड़गड़ानंदजी

॥ ॐ श्री परमात्मने नमः ॥

# गौरवशाली ऐतिहासिक ग्रंथ 'महाभारत'

**प्रिय विद्यार्थ्यांनो!**

महर्षि वेदव्यासद्वारा लिखित ऐतिहासिक ग्रंथ 'महाभारत' हा आर्यावर्त भारताचा प्रामाणिक इतिहास आहे. ह्यामध्ये सृष्टीच्या आरंभापासून ते द्वापार पर्यंतच्या (आजपासून ५२०० वर्षांपूर्वी श्रीकृष्णाच्या कालापर्यंतच्या) भारतीय शिष्टाचार व संस्कृतीचे विवरण केलेले आहे. मानवीजीवनाचा असा कोणताही पैलू नाही की जो ह्यामध्ये स्पर्शिलेला नाही. असे काहीही नाहा की जे महाभारतात समाविष्ट केले गेलेले नाही-लोकनीति, राजनीति, युद्धनीति, व्यवहारनीति, जीवन-दर्शन, अध्यात्म आणि धर्म.



भारतातील ऋषि-मुनींचा सत्याचा शोध (सत्य 'एकमात्र परमात्मा' त्याचा शोध), साधना आणि ईश्वर प्राप्तीचे संपूर्ण विवरण महाभारतामध्ये उपलब्ध आहे. महाभारतात वर्णिलेली सर्व कथानके व घटना सत्य आहेत, आमच्या पूर्वजांची कीर्ति आहे. आपण सर्व त्याच पूर्वजांचे वंशज आहोत.

महर्षि वेदव्यास द्वारा संकलित केलेल्या एक लाख श्लोकांच्या महाभारताचा सहाव्या अध्याय 'भीष्मपर्व'ह्या मध्ये असलेली ७०० श्लोकांची 'श्रीमद्भगवद्गीता' आपले 'धर्मशास्त्र' आहे. ज्यामध्ये 'सत्य' काय आहे आणि त्यास कसे प्राप्त करायचे ते सांगितले गेले आहे. असे हे महान ज्ञान असलेल्या 'गीते'ची संक्षिप्त माहिती ह्या पुस्तिकेच्या प्रारंभी दिलेली आहे. पूर्ण माहिती गीताभाष्य 'यथार्थ गीते' मध्ये उपलब्ध आहे.



'इतिहास' हा मानवी पिढयांच्या सुख-दुःखांच्या घटनांचे संकलन असते तर 'धर्म' अनंत जीवन, शाश्वत शांति, परमात्म्याचे परमधाम प्राप्त करून देतो आणि पुढील पिढयांचा मार्गदर्शक असतो. जेथे धर्म आहे तेथेच विजय असतो. **'यतो धर्मस्ततो जयः।'**

'गीता' हे मानवमात्राचे योगदर्शन शास्त्र आहे, परमपिता परमात्म्याशी योग म्हणजेच मिलन घडवून आणणारी विद्या आहे. भगवान् श्रीकृष्ण जाणत होते की संसारिक युद्धामध्ये जिंकणाऱ्यालाही शाश्वत विजय मिळत नाही. भले तो चक्रवर्ती सम्राट असला तरीही. म्हणून त्यांनी आपल्या सखा-मित्र-शिष्य 'अर्जुना'ला माध्यम बनवून गीतेच्या उपदेशाद्वारे शाश्वत विजयाचे ज्ञान मानवमात्रास प्रदान केले.

महाभारतातील प्रसिद्ध ऐतिहासिक युद्ध कुरुक्षेत्राच्या मैदानावर झाले. कोटयावधि लोक वीरगतीस प्राप्त झाले. विजयी झालेल्या सम्राट युधिष्ठिराला तरीही शांती प्राप्त झाली नाही, शेवटी त्याने राज्य व सर्वस्वाचा त्याग करून हिमालयाची वाट पकडली. युद्धाच्या आरंभी प्राप्त झालेला 'गीते'चा उपदेश त्याच्या डोक्यामध्ये घर करून होता, तो भजन (साधना) करण्यासाठी निघाला.

दुर्योधनाचा एक भाऊ 'युयुत्सु' युद्ध आरंभ होण्यापूर्वीच पांडवांच्या पक्षात आला होता. महाराज युधिष्ठिराला वनामध्ये जाताना बघून तो म्हणाला, "दादा! कोठे निघालात? चक्रवर्ति सम्राटाच्या ह्या रत्नजडित सिंहासनावर कोण बसणार?" महाराज युधिष्ठिर म्हणाला, "युयुत्सु! ह्यावर तू बस आणि बघ त्यामध्ये किती सुख आहे ते! शेवटी स्वजनांचा संहार ह्यासाठीच तर झाला होता." युयुत्सु म्हणाला, "दादा! मला हे कदापि नको आहे." तेव्हा महाराज युधिष्ठिर म्हणाले,"पुत्र परीक्षित कोठे खेळत असेल तर त्याला सांग.तो बसला तर ठीक अन्यथा ह्या गाष्टीची चिंता सोड. भले नश्वरासाठी कशाला अश्रू वहायचे?" असे म्हणून त्या सर्वांनी गीतेत सांगितलेला साधनेचा मार्ग आत्मसात केला.

अशाप्रकारे 'महाभारत' आर्यावर्त भारताच्या इतिहासाबरोबरच त्याच्या संस्कृतीचेही शास्त्र आहे आणि त्याच्याच एका अध्यायात असलेले 'श्रीमद्‌भगवद्‌गीता' हे आपले 'धर्मशास्त्र' आहे.

* * *

# 'महाभारत' व 'गीते' तील बोध देणारे प्रेरक प्रसंग

विद्यार्थ्यांच्या ज्ञानामध्ये भर पडावी म्हणून प्रस्तुत आहेत महाभारत व गीतेमधील बोध देणारे काही प्रेरक प्रसंग. हे सर्व प्रसंग, कथानके व दृष्टांत-पूज्य गुरुदेव श्री अडगडानन्द महाराजांच्या प्रवचनांमधून संकलित केलेले आहेत, त्यांच्या श्रीमुखातील वाणी आहे.

त्यांच्या मनोरंजक, उपदेशात्मक शब्दांच्या वाणीने हे सर्व प्रसंग जणू जिवंत होतात आणि मनःचक्षु पूढे चलचित्राप्रमाणे तरळू लागतात. त्यांना शब्दशः प्रस्तुत करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. आशा वाटते की हे बोधपर प्रसंग सर्व विद्यार्थ्यांना अभ्यासात व साधनेत सहाय्यक ठरतील. त्यांचे अनुकरण करून विद्यार्थी त्यांच्या जीवनामध्ये सुख-शांति, स्वास्थ्य, समृद्धि इत्यादि सर्वकाही प्राप्त करतील.

प्रिय विद्यार्थ्यांनो! महाभारत व गीतेमधील काही बोधपर प्रेरक प्रसंग ह्याच पुस्तिकेच्या भाग–१ मध्ये दिलेले आहेत. कृपया त्यासाठी भाग–१ अवश्य वाचावा, त्यामुळे तुम्हाला प्रेरणा मिळेल.



# प्रेरक प्रसंग – ९

## ‘गीते’चे नियमित अध्ययन व श्रवण करावे.

‘गीते’च्या अठराव्या अध्यायात भगवान श्रीकृष्णांनी म्हटले आहे की ‘‘अर्जुना! आपल्या दोघांमधील हा संवाद म्हणजेच ‘गीता’ जो वाचेल व दुसऱ्या भक्तांना ऐकवेल, त्याच्यापेक्षा महान असे मला प्रिय असणारे कार्य करणारा दुसरा कोणी होणार नाही. जो केवळ श्रवण करेल म्हणजेच कानाने ऐकेल, त्यालाही उत्तम पुण्यलोक प्राप्त होईल.’’ (पूर्ण माहितीसाठी वाचावी-यथार्थ गीता अध्याय १८, श्लोक ६८ ते ७१)

**दृष्टान्त**– महाभारतातील सर्वात मोहांध पात्र म्हणजे महाराज धृतराष्ट्र. राज्य त्यांचे नव्हतेच; तरीही पुत्रमोहापोटी पांडवांना त्यांच्या उत्तराधिकारापासून वंचित करण्यासाठी सतत कपट करण्यात सामील राहिले आणि वरवर दाखवण्यासाठी ‘प्रिय अनुजपुत्रांनो! प्रिय अनुजपुत्रांनो!’ म्हणायचे, परंतु डोक्यावरून कधीही हात फिरवला नाही.

वनवासकाळ पूर्ण झाला होता, पांडवांना त्यांचे राज्य परत करण्याची अट होती. धृतराष्ट्राने संजयला सांगितले, ‘‘जा! प्रिय युधिष्ठिराला माझा आशीर्वाद सांग व म्हण की दुर्योधन दुष्ट आहे, हट्टी आहे, माझे ऐकत नाही. अर्धेराज्यच काय पण पाच गावेही पांडवांना द्यायला तो तयार नाही.तू तर समजुतदार आहेस, भावांमध्ये असे भांडण ठीक नाही. तेव्हा तुम्ही जंगलातच रहा.तसेही आता तुम्हाला त्याची सवय झाली असेल. प्रत्येक बाबतीत शांततेने मार्ग निघालेला बरा.तुमच्या मोठया पिताश्रींची पण तुमच्याकडून हीच अपेक्षा आहे.’’इतके मोहांध होते धृतराष्ट्र.

महाभारतात विजय मिळाल्यावर महाराज युधिष्ठिराने त्यांना सन्मानाने सिंहासनावर बसविले व सेवा करत राहीले. पंधरा वर्षानंतर ते महालातून मध्यरात्री निघून गेले.काही दिवसांनी समजले की ते हरिद्वारला एका वृक्षाखाली बसून साधना करीत आहेत.सहा महिन्यांनी महाराज युधिष्ठिर त्यांना भेटायला गेले. ते दिसले पण तेव्हाच त्यांनी शरीराचा त्याग केलेला होता.ते साधनेच्या मार्गाला लागले होते, संजयच्या माध्यमातून त्यांनी गीता ऐकली होती. इतक्या पापी माणसाचा अंत तर दुःखद व्हावयास हवा होता, परंतु साधना करीत असताना त्यांना मरण आले. अशाप्रकारे गीता ऐकण्याचे फळ, महात्म्यही इतके मोठे असते.

* * *



# प्रेरक प्रसंग – २

## अहंकार असता कामा नये.

विद्याध्ययन पूर्ण झाल्यावर अर्जुनाला स्वतःच्या धनुर्विद्येचा गर्व झाला. विचरण करता करता तो एकदा रामेश्वरला पोहोचला.तेथे त्याला एक लहान माकड दिसले. अर्जुनाने त्याला



विचारले की हा सेतू कसला आहे? माकडाने सांगितले, ‘‘हा रामाचा सेतू आहे.’’ अर्जुन म्हणाला, ‘‘श्रीराम तर विख्यात धनुर्धर होते तरीही दगडाचा सेतू बांधुन घेतला. मी असतो तर बाणांचा सेतू बांधला असता.’’माकड म्हणाले,‘‘त्या काळातील माकडे मोठी बलशाली होती. बाणांचा सेतू त्यांचा भार कसा उचलू शकला असता? मी त्याच प्रभू श्रीरामांचे एक माकड आहे. तुम्ही पूल बांधा, मी लगेच त्याचे परीक्षण करून टाकतो.’’ अर्जुनाने तत्काळ दिव्यास्त्रांचा सेतू तयार केला. हनुमानाने त्यावर पाय ठेवताच तो बुडाला. हनुमान पोहत बाहेर आले व म्हणाले, ‘‘बाबा! हा तर तुटून गेला.’’

अर्जुनाला खेद झाला. त्याची प्रतिष्ठा पणाला लागली होती. भगवंताजवळ त्याने प्रार्थना केली की ह्यावेळी सेतू तुटला तर तो आत्मदहन करेल. अर्जुनाने पुन्हा दिव्यास्त्रांना आवाहन करून बाणांचा पूल निर्माण केला. सेतू पाहून हनुमानाने स्वतःचा आकार वाढविला व ते पाहून अर्जुनाने ओळखले की आज त्याला अग्निसमाधी घ्यावीच लागणार. हनुमान नवीन सेतूवरुन थोडे चालले, उडया मारल्या तरी सेतू तूटला नाही. जोरजोरात उडया मारल्या तरी सेतू जसाच्या तसा. त्यांना मोठे आश्चर्य वाटले. तेवढयात समुद्रात रक्ताची धार दिसली. हनुमान उडी मारून किनाऱ्यावर आले व बघितले तर काय स्वतः भगवंतांनी पुलाला पाठीचा आधार दिला होता. हनुमानाने त्यांच्या चरणांवर लोळण घातले ‘‘प्रभू श्रीराम आपण!’’ अर्जुनही चरणांवर लोळण घालत म्हणाला‘‘केशवा आपण!’’(हनुमानाला श्रीराम दिसत होते आणि अर्जुनाला श्रीकृष्ण) भगवंत म्हणाले ‘‘अर्जुना त्यांना प्रणाम कर.ते बजरंगबली हनुमान आहेत आणि आजपासून गर्व करणे सोडून दे.’’

शौर्य, बुद्धिमत्ता, शिक्षण, धन आणि शक्ति ह्यांना कोठे अंत नसतो. तेव्हा विद्यार्थ्यांनी गर्व न करता ह्या गोष्टींचा लोकहितासाठी सदुपयोग केला पाहिजे.

* * *

# प्रेरक प्रसंग – ३

## ब्रह्मचर्यमध्ये अमर्याद शक्ति असते.

**पहिला दृष्टांत–**

हिमालयातील दऱ्याखोऱ्यांमधून फिरत असताना भीमाला अलकनंदा नदीमध्ये एक कमळाचे फूल मिळाले, ते त्याने द्रौपदीला दिले. द्रौपदी म्हणाली, ‘‘प्रिय भीमा! हे तर विलक्षण सहस्त्रदल कमल आहे. जर ते नदीतून वाहत आले असेल तर वर कोठे ना कोठेतरी त्याचा उगम असला पाहिजे. एक ताजे फूल मला आणून द्यावे, मी ते महाराज युधिष्ठिराला भेट देईन.’’ भीम नदीच्या उगमाच्या दिशेने चालत जाऊ लागले.



दोन पर्वतांमधील नदीच्या अरुंद काठावर एक माकड मधेच झोपलेले होते. त्याने त्याची शेपटी पसरून मार्गअडवला होता.भीमाने त्यास शेपटी बाजूला करण्यास सांगितले. ती म्हणाला, ‘‘बाबारे! तब्येत खराब आहे, उठणे शक्य नाही. तेव्हा तूच ओलांडून पुढे जा अथवा शेपटी बाजूला सरकव.’’भीम मनात म्हणाला ह्याला तर डाव्या हाताने उचलून डोंगराच्या पलिकडे फेकून देऊ शकेन.भीमाने शेपटी सरकवण्याचा प्रयत्न केला परंतु शेपटी जरासुद्धा हलली नाही. तेव्हा भीमाने उजवा हात, मग दोन्ही हात व सारी शक्ति लावली. घामाघूम झाले तरीही शेपटी हलली नाही. तेव्हा हात जोडून भीम म्हणाले ‘‘भगवंत! आपण कोण आहात? माकड तर आपण असूच शकत नाही.कृपया आपला परिचय द्या.’’

माकड म्हणाले,‘‘मी पवनपुत्र हनुमान!’’भीम म्हणाला,‘‘मी वायुपुत्र भीम?’’एकाच पित्याचे दोन पुत्र. लहान भाऊ मोठया भावाची शेपटीसुद्धा हलवू शकला नाही; कारण हनुमान होते अखंड बालब्रह्मचारी व भीम होते गृहस्थाश्रमी.

ब्रह्मचर्यमध्ये अमर्याद शक्ति असते. सृष्टीमध्ये सर्वश्रेष्ठ बळ ब्रह्मचर्येत आहे. प्रत्येक मुला-मुलींमध्ये इंद्रियांचा संयम पक्का असला पाहिजे. मनामधील शुध्द विचारांनीच त्यात सफलता मिळते.‘‘गीता’’ वाचल्याने मनातील विचार शुध्द होतात.

**दूसरा दृष्टान्त–**

पितामह भीष्म अखंड बालब्रह्मचारी होते. ह्या व्रताचे रक्षण करण्यासाठी त्यांनी त्यांचे विद्या-गुरु श्री परशुराम ह्यांचा, काशीराजाची कन्या अम्बेशी विवाह करण्याचा आदेशही स्वीकारला नाही. रागावलेल्या परशुरामांनी भीष्मांना सांगितले ‘‘माझ्याशी युध्द कर.’’ भीष्मांनी त्यांना नमस्कार केला, त्यांच्याशी युध्द केले व त्यात त्यांना नि:शस्त्र करून त्यांचा आशीर्वाद मिळविला. महाभारत युध्दात जवळ जवळ पावणे तीन कोटी योध्दयांनी युध्द केले, नंतर आणखी तेवढेच योध्देही लढले, परंतु कोणीही पितामह भीष्मांच्या तोडीचा नव्हता.

परमेश्वर प्राप्तीच्या पथावरून चालणाऱ्यांचे सर्व बळ ब्रह्मचर्येतच असते. विद्यार्थ्यांचेही बळ ब्रह्मचर्य हेच आहे आणि त्यांचा शिक्षणकाळच ब्रह्मचर्य आश्रम आहे,त्यानंतर गृहस्थाश्रम (वैवाहीक जीवन) तर असतोच. ब्रह्मचर्य व्रताचे दृढतेने पालन करण्यासाठी एका परमात्म्याचे स्मरण आणि सकाळ-संध्याकाळ ॐ चा जप करावा.

* * *

# प्रेरक प्रसंग – ४

## धर्मच सफलतेचा ठेवा आहे.

जीवन एक संघर्ष आहे. ह्यामध्ये तोच सुरक्षित असतो, अवध्य असतो आणि विजयी होतो जो धर्मानुसार वागतो, एका परमेश्वराला शरण जातो. धर्मपरायण मनुष्य नेहमी परमेश्वराच्या वरदहस्ताखाली असतो. धर्मच त्याचे बळ असते. पांडवांवर जेव्हा-जेव्हा संकट आले, तेव्हा धर्मराज युधिष्ठिराने सर्वांना वाचवले.

**कथा** - वनवासकाळात तहानलेले पांडव एका यक्ष रक्षण करीत असलेल्या तलावातील पाणी, यक्षाने विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे न देता हट्टाने प्यायले. एक एक करून चारही भाऊ बेशुद्ध होऊन पडले. शेवटी धर्मराज युधिष्ठिर तेथे पोहोचले व यक्षाच्या चारही प्रश्नांची उत्तरे देऊन त्यांनी आपल्या भावांना जीवित केले.



## यक्ष-प्रश्न आणि धर्मराज युधिष्ठिराने दिलेली उत्तरे

*पहिला प्रश्न* – **को मोदते?** – सुखी कोण असते?

*उत्तर* – सुखी ती असती जी समाधिमध्ये स्थित असती. म्हणजेच जी परमेश्वराशी तद्रुप असती, तीच सहज सुखास प्राप्त होती.

*दुसरा प्रश्न*– **किं आश्चर्यम्?**– जगातील सर्वात मोठे आश्चर्य कोणते?

*उत्तर* – रोज आजुबाजूच्या लोकांना मरण पावताना बघूनही लोक स्वतःला अमर समजतात.त्यापासून आपली सुटका कशी होईल?- हे जाणण्याचा प्रयत्न करीत नाहीत. ह्यापेक्षा आणखी मोठे आश्चर्य काय असू शकते?

*तिसरा प्रश्न* – **कः पन्था?**– यथार्थ मार्ग कोणता?

*उत्तर* – महापुरुष, अर्थात परमेश्वराचे निःसीम भक्त ज्या नियम - व्यवस्थेनुसार चालतात, तोच यथार्थ मार्ग होय.

*चौथा प्रश्न* – **का च वार्तिका?**– योग्य गोष्ट कोणती?

*उत्तर* – अध्यात्म ! जे परमतत्त्व परमात्मा वा आत्म्याचे प्रभुत्व स्थापित करते आणि परमात्म्याचा मार्ग मोकळा करते.

(मुलांनो ! हे सर्व यक्ष प्रश्न चिर-प्राचीन असले तरी चिर-नवीनही आहेत. आजच्या काळाचे आहेत, आपणा सर्वांचे आहेत आणि असायलाही हवेत कारण त्यांपासून आपल्याला प्रेरणा मिळते.)

युधिष्ठिराने दिलेल्या उत्तरांवर संतुष्ट होऊन यक्षाने त्याच्या कोणत्याही एका भावास जिवंत करण्याचा प्रस्ताव ठेवला. युधिष्ठिर म्हणाला, “मला दोन माता आहेत. कुंती मातेचा एक पुत्र म्हणजे मी जिवंत आहे, तेव्हा माता माद्रीचाही एक पुत्र जिवंत असायला हवा. म्हणून तुम्ही भ्राता नकुलाला जिवंत करा.”

युधिष्ठिराची न्यायप्रियता पाहून यक्षाने सर्व भावांना जिवंत केले आणि युधिष्ठिराने केलेल्या याचनेमुळे प्रकट होऊन स्वतःचा परिचय दिला .“वत्सा मी तुझा पिता ‘धर्म’ आहे. मी हे पहायला आलो होतो की तू धर्मामध्ये तत्पर आहेस की नाही. तुझी धर्मपरायणता पाहून मी प्रसन्न झालो.”

आजकालचे वडील शिकत असलेल्या आपल्या मुलाला भेटायला चॉकलेट घेऊन जातात, आईने बनवलेला खाऊ घेऊन जातात. परंतु आपले पूर्वज स्वतःच्या मुलांची कठीण परीक्षा घ्यायचे. धर्माच्या बळावरच महाराज युधिष्ठिराने वेळी-वेळी आपल्या भावांचे रक्षण केले.

* * *

## प्रेरक प्रसंग – ५

### परमेश्वराच्या संरक्षणाखाली सर्वकाही प्राप्त होते.

युद्ध होणे अटळ झाले. कौरव व पांडव दोन्ही पक्ष आगामी युद्धाच्या तयारीला लागले. युद्धामध्ये मदत मागण्यासाठी अर्जुन व दुर्योधन श्रीकृष्णाकडे गेले. दुर्योधनाने विचारले,"केशवा! ह्या युद्धात आपण कोणाच्या बाजूने असाल?"श्रीकृष्ण म्हणाले "मी समदर्शी आहे. सृष्टीमध्ये ना कोणी माझा मित्र आहे आणि ना कोणी शत्रू. माझ्याकडे जो प्रथम मदत मागायला येईल त्याच्याबाजूने मी असेन."

शकुनीने हे ऐकले व म्हणाला"दुर्योधना! आपले काम झाले. अर्जुन प्रातःकाली स्नान-ध्यान वगैरे करत बसेल त्याला त्याची भक्ति करू देत. तू रात्रीच निघ व तिथे आधी पोहोच. जर आपण कृष्णाला आपल्या बाजूने केले तर पांडवांजवळ काय राहिले?" दुर्योधन लगेचच निघाला.

भगवंतांनी जाणले उद्धट दुर्योधन येत आहे. तो आहे अतिशय मूर्ख. आल्यावर स्वतःला बसण्यासाठी आसन शोधेल. एक सुवर्ण सिंहासन डोक्यापाशी ठेऊन भगवंत गाढ झोपून गेले. दुर्योधन आला. आधी आल्यामुळे तो खूश होता. कंबरेवर हात ठेऊन बसण्यासाठी जागा शोधू लागला. तर सिंहासन नजरेस पडले. त्याने विचार केला बहूतेक त्याच्यासाठीच ठेवलेले असावे.



काहीही असो हे यदुवंशी अतिथी-सत्कार चांगला करतात. तो ऐटित त्यावर बसला.

काही वेळानंतर अर्जुनही आला. त्याला आधी वा नंतर तेथे पोहोचल्याची चिंताच नव्हती. त्याने भगवंतांच्या चरणांना प्रणाम केला आणि तेथेच जमिनीवर बसला. भगवंतांच्या उठण्याची तो प्रतीक्षा करत राहीला. हात जोडून त्यांच्या श्रीमुखाचे दर्शन घेत राहीला.

भगवंत झोपेतून जागे झाले, म्हणाले,"अर्जुना! कधी आलास?" अर्जुन उत्तर देणार त्या आधीच दुर्योधन म्हणाला," प्रथम मी आलो आहे." भगवंतांनी वळून पाहिले व म्हणाले "बाबा तू आधी आलास अवश्य; परंतु माझी दृष्टि प्रथम अर्जुनावर पडली. कोणी आल्याचे तेव्हाच कळते जेव्हा समोरा-समोर भेट होते. नजरेआड कोणी बसलेले असेल किंवा काही ठेवलेले असेल तर कळत नाही." दुर्योधन घाबरला, त्याला वाटले यामधे काही डाव तर नाही, श्रीकृष्णाच्या असे बोलण्याचा आशय तरी काय?

भगवंत म्हणाले, "दुर्योधना! चिंता करू नकोस. माझ्याजवळ दोन पर्याय आहेत. एक म्हणजे यदुवंशीयांची अजेय नारायणी सेना आणि दुसरीकडे मी एकटा, परंतु मी युद्ध करणार नाही, शस्त्र हाती घेणार नाही. तुम्ही दोघे एक-एक पर्याय निवडा." दुर्योधन म्हणाला, "केशवा! मी प्रथम आलो आहे, तेव्हा प्रथम मी मागणार." श्रीकृष्ण म्हणाला, "ठीक आहे! तू मला माग" दुर्योधन चिडला,"परत धोकेबाजी!जर शस्त्र उचलणार नाही,युद्ध करणार नाही तर काय बासरी वाजवून मला नाचायला लावणार? मला तुमची नारायणी सेनाच द्या." श्रीकृष्ण म्हणाला, "तसेच होईल." दुर्योधन विशाल नारायणी सेनेच्या मध्यभागी उभा राहून आनंदाने म्हणाला, "विजय तर मिळालाच म्हणून समजा."अर्जुन व श्रीकृष्णाकडे त्याने बघितले. आता ह्या गवळयाकडे काय राहिले? वाजव बासरी आणि कर उपदेश. तो प्रसन्न होऊन निघून गेला.

इथे वळून भगवंतांनी अर्जुनाकडे पाहिले व म्हणाले "अर्जुना! तुला?" अर्जुन म्हणाला "भगवंत! मागण्याची संधी प्रथम मला मिळाली असती तरीही मी आपल्यालाच मागितले असते. हे गोविंद! माझी प्रबळ इच्छा आहे की आपला वरदहस्त सतत माझ्या डोक्यावर रहावा. जसे आपण आज्ञा देत रहाल तसे मी युद्ध करेन. मला नारायणी सेना नको. केवळ आपण हवे आहात."

बरोबर युद्धाच्या अठराव्या दिवशी नारायणी सेनेचा ठाव-ठिकाणाही शिल्लक राहिला नाही. अकरा अक्षौहिणी सेनेचा अधिपती असलेला दुर्योधन मांडया तुटलेल्या अवस्थेत एकटा, असहाय्य होऊन रणांगणावर पडला. आजूबाजूला कोल्हे-गिधाडे त्याच्या आतडयाचे लचके तोडायला तयारच होते. जन्मभर खोटेपणाने, कपटाने व शकुनी मामाच्या डावपेचांनी जे काही त्याने मिळविले होते, ते सर्व सहजपणे पांडवांना मिळाले.

म्हणून जर परमेश्वराकडे मागावेच लागले तर कोणतीही वस्तू मागू नका, ऐश्वर्य मागू नका, परमेश्वरालाच मागा. परमेश्वर जेथे रहातो, तेथेच ऐश्वर्य रहाते. भगवंत अविनाशी आहेत, तेव्हा अविनाशी स्थानही रहाते. ते सर्वज्ञ आहेत, तेव्हा सर्वज्ञता रहाते. भगवंत जेव्हा जवळ करतात तेव्हा आपली भगवत्ता प्रदान करतात.

* * *

# ॐ

# 'यथार्थ गीता' चे रचयिता

## सद्गुरु स्वामी श्री अड़गड़ानन्द जी महाराज



यथार्थ गीतेचे रचनाकार एक परमात्मस्थित महापुरुष आहेत. त्यांच्याजवळ कोणत्याही शैक्षणिक पदव्या नाहीत, परंतु सद्गुरुंच्या कृपेने पूर्णत्व प्राप्त करून मानवमात्राचे कल्याण करण्यामध्ये ते निमग्न आहेत– **'सर्वभूतहिते रतः'**। लेखनाला आपण साधनेमधील अडथळा मानायचात परंतु गीता भाष्य 'यथार्थ गीता' लिहीण्यामागे परमेश्वराचा आदेशच निमित्त बनला.

परमेश्वराने आपल्याला अनुभवामध्ये सांगितले की तुमच्या साऱ्या वृत्ति शांत झालेल्या आहेत, केवळ एक लहानशी वृत्ति शेष आहे, ती म्हणजे गीताज्ञानाचे यथावत् पुर्नप्रकाशन! प्रथम तर आपण ह्या वृत्तीस साधनेने नष्ट करण्याचा प्रयत्न केलात परंतु... भगवंताच्या आदेशाने 'यथार्थ गीता' मूर्तस्वरुप झाली.

'यथार्थ गीते' च्या रचनेच्या काळात, टीकेमध्ये जेथे त्रुटी होत होत्या, भगवंत त्या सुधारत होते! पूज्य स्वामींची 'स्वान्तः सुखाय' अशी काळावर विजय मिळवलेली ही रचना 'सर्वान्तः सुखाय' बनली आहे. आर्यावर्त भारतातीलच नव्हे तर विश्वातील मानवमात्राच्या कल्याणामध्ये अनुरक्त आहे.

यथार्थ गीतेच्या प्रकाशात आपणही प्रकाशमान व्हा.

* * *

# 'यथार्थ गीते' मधून–

## कर्म

*** कर्म म्हणजे काय हे जाणण्यातच,**
**भगवद्गीता समजण्याचे रहस्य आहे.***

पूर्ण गीतेमध्ये श्रीकृष्णाने कर्माला निर्धारित कर्म, तदर्थ कर्म, कार्यम् कर्म, यज्ञार्थ कर्म, कर्तव्य कर्म, पुण्य कर्म इत्यादि संबोधने वापरली आहेत. ज्याचा शुध्द अर्थ आहे- आराधना क्रिया.

## श्रीभगवानुवाच

**नियतं कुरु कर्म त्वं कर्म ज्यायो ह्यकर्मणः।**
**शरीरयात्रापि च ते न प्रसिद्ध्येदकर्मणः।।** (गीता, ३/८)

अर्जुना ! तू नियत कर्म म्हणजेच निर्धारित केलेले कर्म कर. तशी तर कर्मे अनेक आहेत, त्यामधील एक निवडलेले आहे तेच नियत कर्म तू कर. ज्यामुळे शरीर- यात्राही पूर्ण होईल म्हणजेच शरीर त्यागणे व शरीर धारण करण्याचा क्रम समाप्त होईल, परमात्म्यामध्ये प्रवेश मिळेल.

योगेश्वर श्रीकृष्णांनी पुढच्याच श्लोकात सांगितले आहे की ते निर्धारित कर्म कोणते?

**यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र लोकोऽयं कर्मबन्धनः।** (गीता, ३/९)

ते निर्धारित कर्म म्हणजे 'यज्ञ' होय अर्थात् यज्ञाला कार्यान्वित करणे हेच 'कर्म' आहे. ह्या यज्ञ-कर्मा व्यतिरिक्त जे काही केले जाते, ते ह्या लोकीचे बंधन असते. कर्माचा शुध्द अर्थ आहे- आराधना वा चिंतन! गीतेनुसार एका परमात्म्याचे निर्धारित विधीने ध्यान- पूजन- भजन !

'कर्म' व 'यज्ञ' ह्याबद्दल पूर्ण माहितीसाठी वाचा 'यथार्थ गीता' अध्याय तिसरा व चौथा.

---

## यज्ञ

*** आराधनेच्या, चिंतनाच्या विशेष विधीचे नाव यज्ञ होय. ***

भगवान श्रीकृष्णांनी 'गीतेच्या' चोथ्या अध्यायात तेरा-चौदा प्रकारच्या यज्ञांचे वर्णन केले आहे.सर्व मिळून परमात्म्यामध्ये प्रवेश मिळवून देतात. हे सर्व यज्ञ श्वासाने, ध्यानाने, भजन-चिंतनाने आणि इंद्रियांच्या संयमाने सिध्द होतात.

- यज्ञ पूर्ण झाला की परमात्म्याचे दर्शन आणि त्याची प्राप्ति होते.
- ह्या निर्धारित यज्ञाला कार्यान्वित करणे हेच कर्म होय.
- कर्माचा शुध्द अर्थ आहे - 'आराधना.'

---

## वर्ण

'वर्ण' हा एक यौगिक शब्द आहे, आदिशास्त्र गीतेतील शब्द आहे, साधनेमधील श्रेणीचा द्योतक आहे. कालांतराने समाज व्यवस्थापकांनी वर्णाच्या नावावर भारतामध्ये चार जाती बनविल्या आणि त्यांची सत्यता गीतेतील पुरावा देऊन सिध्द करीत राहीले, जे पुर्णपणे चुकीचे आहे, भ्रामक आहे. चला! वर्ण म्हणजे काय ते जाणून घेऊया –

**चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः।** (गीता, ४/१३)

अर्जुना! चार वर्णांची रचना मी केली. माणसांना नव्हे तर त्यांच्यातील गुणांच्या योग्यतेनुसार नियत कर्माला - आराधनेला चार वर्णांमध्ये, श्रेणींमध्ये वा सोपनांमध्ये विभागले आहे. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र हे चारही वर्ण एकाच साधकाच्या उच्च-नीच अवस्था आहेत. एकच साधक शूद्र श्रेणीपासून उन्नति करत करत वैश्य, मग क्षत्रिय व शेवटी ब्राह्मण श्रेणी प्राप्त करू शकतो. त्यापेक्षाही उन्नत होताच तो ब्राह्मणही रहात नाही, केवळ परमात्माच शेष रहातो.

तेव्हा विद्यार्थ्यांकडून अशी अपेक्षा आहे की वर्तमान समाजातील जातीव्यवस्थेची खाई भरून काढून आपल्या सर्व वर्ग मित्रांबरोबर समान व्यवहार करावा. एकत्रित समाजाची स्थापना करावी.

* * *

## 'यथार्थ गीते' मधून –

ती सर्वसमर्थ सदा रहाणारा परमेश्वर मानवाच्या हृदयामध्ये स्थित असतो. भावपूर्ण होऊन त्याला शरण जा, ज्यामुळे शाश्वत धाम, सदा रहाणारी शांतता व अनंत जीवनाची प्राप्ति होते.

विश्वाच्या एकतेसाठी ११वी-१२वी च्या पुढील इयत्तां मधील मुलांसाठी श्रीमद्‌भगवद् गीता भाष्य 'यथार्थ गीते' चे नियमित अध्ययन श्रेयस्कर ठरेल व अभ्यासक्रमातच त्याचा समावेश केला पाहिजे.

# पूज्य स्वामी श्री अड़गड़ानंदजी महाराजांना समर्पित केलेल्या पदव्या व सन्मान पत्रे.

श्रीमद्भगवद्गीता हे एक ईश्वरीय गायन आहे.'यथार्थ गीते'च्या रुपात गीतेचा आशय प्रस्तुत करून स्वामीजींनी विश्वातील मानवास एक कालजयी, परमकल्याणकारी असे सर्वमान्य धर्मशास्त्र प्रदान केले आहे. त्यांच्या ह्या गौरवास्पद श्रेष्ठ आध्यात्मिक योगदानाचा स्वीकार करून, खालील पदव्या व सन्मानपत्रांनी स्वामीजींना गौरवण्यात आले आहे.

- राष्ट्रपती स्व. डॉ. शंकरदयाळ शर्मा ह्यांनी पूज्य स्वामीजींचा राष्ट्रपती भवनात सन्मान करून 'यथार्थ गीते' च्या ऑडियो कॅसेटचे उदघाटन केले.

  (राष्ट्रपती भवन, दि. १३ जानेवारी १९९४)

- हरिव्दार (भारत) येथील विसाव्या शतकाच्या शेवटच्या महाकुंभ मेळयामध्ये समस्त शंकाराचार्य, महामंडलेश्वर, ब्राह्मण महासभा आणि ४४ देशांच्या धर्मशील विद्वानांच्या उपस्थितीत 'विश्वधर्म संसदे' द्वारा पूज्य स्वामीजींना 'विश्वगौरव' ह्या सन्मानाने विभूषित करण्यात आले.

  (हरिव्दार, दि. १० एप्रिल १९९८)

- प्रयाग येथे एकवीसाव्या शताकातील पहिल्या महाकुंभ पर्वात 'विश्वधर्म संसदे' ने 'यथार्थ गीते' ला विश्वातील मानवाचे एकमेव धर्मशास्त्र म्हणून घोषित केले व त्याचे रचनाकार पूज्य स्वामीजींना 'विश्वगुरु' ह्या पदवीने सम्मानित केले.

  (प्रयाग, दि. २६ जानेवारी २००१)

- भारतात सर्वात श्रेष्ठ असलेली विद्वत् संस्था 'श्री काशी विद्वत् परिषदे'ने 'श्रीमद्भगवद्गीते' ची धर्मशास्त्र म्हणून व 'यथार्थ गीते' ची शत प्रतिशत सत्यभाष्य म्हणून शिफारस केली.

  (वाराणसी, दिनांक १ मार्च २००४)

- 'विश्व सम्मेलन अप्रवासी' भारतीय अर्द्धकुंभ महोत्सवात-प्रयाग मध्ये 'श्रीमद्भगवद्गीते' चे भाष्य असलेल्या 'यथार्थ गीते' ला सर्वांच्या सम्मतीने 'भारताचा गुरुग्रंथ' व 'मानव धर्मशास्त्र' म्हणून घोषित केले गेले.

  (प्रयाग, दि. १० फेब्रूवारी २००७)

- अलाहाबाद येथील उच्च न्यायालयाच्या विद्वान न्यायाधिशांनी 'श्रीमद्भगवद्गीते' ला राष्ट्रीय धर्मशास्त्र म्हणून घोषित करताना आपल्या निर्णयात त्याचे भाष्य असलेल्या 'यथार्थ गीते' मध्ये प्रतिपादन केलेल्या धर्म-सिद्धांतांचा आणि व्याख्यांचा प्रामुख्याने उल्लेख केला.

  (अलाहाबाद हायकोर्ट, दि. ३० ऑगस्ट २००७)

- पं. मदनमोहन मालवीयांनी स्थापन केलेल्या 'अखिल भारतीय ब्राह्मण महासभे'ने दिल्लीमध्ये आपल्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत पूज्य स्वामीजींना दिल्या गेलेल्या वरील सर्व सम्मानांचा उल्लेख करीत त्यांचे अभिनंदन केले आणि 'श्रीमद्भगवद्गीते' चे विशुद्ध भाष्य असलेल्या 'यथार्थ गीते' ला 'विश्वमानवाचे धर्मशास्त्र' म्हणून स्वीकारून त्यास 'राष्ट्रीय धर्मशास्त्रा' चा सम्मान देण्याची शिफारस केली.

  (रा. का. बैठक, दि. २९-३० सप्टेंबर, २००७)

।। सर्वभूतहिते रतः ।।

।। योगक्षेमं वहाम्यहम् ।।

ब्रह्मवेत्ता • तत्वदर्शी • तीर्थंकर • पैगम्बर • योगेश्वर • सद्गुरु • महापुरुष • मसीहा • परमहंस • पुरुषोत्तम



**ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम् !**
**मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः!! गीता, ४/११**

हे पार्था, जे मला जितक्या उत्कटतेने भजतात मीही त्याच प्रमाणात त्यांना भजत असतो. महापुरुष भक्ताला कसे भजतात ? ते त्याच्या जीवनरथाचा सारथी बनून उभे राहतात, त्याला मार्गदर्शन करु लागतात. हेच महापुरुषांचे भजणे आहे. हे रहस्य जाणून विद्वान, श्रध्दाळू लोक संपूर्ण भाक्तिभावाने, पूर्णपणे समर्पित होऊन माझाच मार्ग अनुसरतात.


**श्री परमहंस स्वामी अड़गड़ानन्दजी आश्रम ट्रस्ट**

न्यू अपोलो स्टेट, गाळा नं. 5 अणि 11 मोगरा लेन,(रेलवे सब-वे च्या जवळ), अंधेरी पूर्व,
मुम्बई - 400069 भारत. फोन : (091-22) 2825 5300
ईमेल : contact@yatharthgeeta.com वेबसाइट : www.yatharthgeeta.com